१०३ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, रविवार २४ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३३७, पाने-८, किंमत : ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 337, Marathi - Daily - Pune, 24 August, 2025 Page- 8 Price- Rs. 7/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## उत्तर प्रदेशात दरडोई कर्ज ३७ हजार ५०० रुपये

**लखनौ-** उत्तर प्रदेश या राज्यावरील कर्ज सन २०२०-२१ मध्ये ६ लाख कोटी रुपयांवरून सन २०२५-२६ मध्ये ९ लाख कोटी रुपयांवर जाण्याचे अनुमान आहे. त्यामुळे या राज्यातील दरडोई कर्जातही वाढ होणार आहे. राज्यात प्रत्येकाच्या डोक्यावर सुमारे ३७ हजार ५०० रुपयांच्या कर्जाचा बोजा असणार आहे. महत्वाची बाब म्हणजे कर्जाची रक्कम एवढी वाढली असली तर राज्याची वित्तीय तूट रिझर्व्ह बँकेने आखून दिलेल्या मर्यादितच राहिली आहे. राज्याच्या वित्त आयागाने नुकतीच ही आकडेवारी जाहीर केली आहे. त्यानुसार सन २०२३-२४ राज्यावरील कर्ज ७.७६ लाख कोटी रुपये होते. २०२५-२६ मध्ये ते ९.०३ लाख कोटी रुपयांवर पोहोचणे अपेक्षित आहे. सन २०२५-२६ साठी वित्तीय तूट ९१ हजार ४०० कोटी रुपये राहणे अपेक्षित आहे. ही वित्तीय तूट राज्याच्या सकल उत्पन्नाच्या २.९७ टक्के आहे. रिझर्व्ह बँकेने वित्तीय तूट ३ टक्के राखण्याची मर्यादा राज्यांना घालून दिली आहे.

## जयसाठी पाकिस्तानशी क्रिकेट? उद्धव ठाकरेंची केंद्र सरकारवर टीका

**पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारमध्ये जाऊन आमच्यावर टीका करतात. पण त्यांच्या आजूबाजूला दंभमेळा भरला आहे. एवढेच नाही, तर महाराष्ट्रातील महायुतीचाही दंभमेळा भरला आहे. ह्यांना चांगले शिक्षक मिळाले असते तर आज देशाची ही अवस्था झाली नसती, अशी घणाघाती टीका आज उद्धव ठाकरे यांनी केली. राज्य शिक्षक सेनेच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे बोलत होते.**



■ मुंबई

**यावेळी** उद्धव ठाकरे म्हणाले की, मी हिमालयासारखा सर्वांच्या पाठीशी आहे, पण तेवढा थंड नाही. आमचे शिक्षक आमदार चांगले काम करत आहेत. शिक्षणाचा दर्जा उंचावला पाहिजे. आमचा कोणत्याही भाषेला विरोध नाही, पण सक्तीने भाषा शिकवली जाणार नाही. पंतप्रधान मोदी माझ्यापेक्षा चांगली हिंदी बोलतात, पण ती फक्त आश्वासन देण्यासाठीच वापरतात. काल त्यांनी बिहारमध्ये आमच्यावर टीका केली की, मविआ आणि इंडिया आघाडी भ्रष्टाचाऱ्यांना रक्षण देत आहे. पण मोदी तुमच्या महायुतीचा महाराष्ट्रात दंभमेळा भरला आहे. हे सर्व ढोंगी आहेत. ज्यांच्यावर तुम्ही आरोप केले ते आज तुमच्यासोबत आहेत.

पुढे ते म्हणाले » पान २ वर

# अनिल अंबानींच्या घरी सीबीआयची धाड
# ईडीच्या १० तासांच्या चौकशीनंतर पुन्हा कारवाई

■ मुंबई

**रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड (आरकॉम)चे अध्यक्ष व कार्यकारी संचालक असलेले उद्योगपती अनिल अंबानी यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी १७,००० कोटी रुपयांच्या कर्जफसवणूक प्रकरणी ईडीने त्यांच्या देशभरातील कार्यालयांवर धाडी टाकल्या. त्यानंतर त्यांना कार्यालयात बोलावून त्यांची १० तास चौकशी केली . ईडीनंतर आज सीबीआयचे पथक सकाळीच मुंबईतील त्यांच्या घरी चौकशीसाठी पोहोचले. स्टेट बँक व इतर बँकांची ३ हजार कोटींच्या फसवणूक प्रकरणी हे छापे टाकण्यात आले .**

**स्टेट** बँक व इतर बँका मिळून ३,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान पोहोचवणाऱ्या बँक फसवणूक आरोप प्रकरणी सीबीआयने रिलायन्स कम्युनिकेशन्स आणि त्यांचे प्रवर्तक संचालक अनिल अंबानी यांच्याविरुद्ध खटला दाखल केला आहे. यासंदर्भात चौकशीसाठी आज सकाळी आठ वाजता सीबीआयचे पथक अनिल अंबानी यांच्या कफ परेड येथील सी विंड या निवासस्थानी दाखल झाले. या पथकात आठ अधिकारी होते. या अधिकाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानी विविध कागदपत्रांची तपासणी केली. यावेळी अनिल अंबानी यांचे कुटुंब घरात उपस्थित होते. सीबीआय पथकाने त्यांच्या घरातून काही कागदपत्रे जप्त केल्याचे सांगितले जात आहे.

अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कम्युनिकेशन्स या कंपनीची दिवाळखोरी प्रक्रिया सुरू आहे. कंपनीच्या दिवाळखोरीच्या या ठरावाला कर्जदारांच्या समितीने मान्यता दिली असून ६ मार्च २०२० रोजी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे तो देण्यात आला आहे. परंतु त्यावर अजून निर्णय झालेला नाही. अनिल अंबानी यांच्या विरोधात वैयक्तिक दिवाळखोरी निराकरण प्रक्रियादेखील सुरू आहे. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे तिची सुनावणी सुरू आहे. दरम्यान,



रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड आणि अनिल अंबानी विरुद्ध इतर अनेक तक्रारी नोंदवल्या जात आहेत. स्टेट बँक ऑफ इंडियाने १० नोव्हेंबर २०२० रोजी अनिल डी. अंबानीसह त्यांचे खाते आणि प्रवर्तकांना फ्रॉड म्हणून वर्गीकृत केले होते. ५ जानेवारी २०२१ रोजी स्टेट बँकने सीबीआयकडे तक्रार दाखल केली . मात्र, ६ जानेवारी २०२१ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने जारी केलेल्या जैसे थे आदेशामुळे तक्रार मागे घेण्यात आली होती. १३ जून २०२५ रोजी स्टेट बँकेने पुन्हा अधिकृतपणे रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड आणि त्यांचे प्रमोटर संचालक अनिल अंबानी यांना फ्रॉड म्हणून वर्गीकृत केले. १ जुलै २०२५ रोजी कंपनीने मुंबई स्टॉक एक्सचेंजला याची माहितीही दिली आहे. बँकेने रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड विरुद्ध तक्रार केली असून त्यात म्हटले की, अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कम्युनिकेशन्सने बँकेकडून घेतलेल्या कर्जामध्ये फसवणूक केल्यामुळे बँकेचे तब्बल ३,०७३ कोटींहून अधिक रुपयांचे नुकसान झाले आहे. कंपनीच्या एकूण थकबाकीमध्ये २६ ऑगस्ट २०१६ पासून जमा झालेले व्याज आणि खर्चासह २,२२७.६४ कोटी रुपयांचे निधी-आधारित मुद्दल थकबाकी, ७८६.५२ कोटी रुपयांच्या नॉन-फंड-आधारित बँक गॅरंटीचा समावेश आहे. लोकसभेत अर्थ राज्य मंत्री पंकज चौधरी यांनी यासंदर्भात लेखी उत्तर दिले आहे. त्यानंतर सीबीआयच्या कारवाईला वेग आला. दरम्यान अनिल अंबानी किंवा सीबीआयने या धाडीबाबत कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण किंवा माहिती दिलेली नाही.

## परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी अमित ठाकरे-आशिष शेलार भेट

■ मुंबई

**महाराष्ट्र** नवनिर्माण विद्यार्थी सेना अध्यक्ष अमित ठाकरे



आणि काही पदाधिकाऱ्यांनी आज सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची वांद्रे येथील कार्यालयात भेट घेतली. गणेशोत्सवाच्या अकरा दिवसांच्या कालावधीत शाळा व महाविद्यालयांच्या परीक्षा रद्द करून पुढे ढकलाव्यात, अशी मागणी त्यांनी यावेळी केली. या भेटीनंतर अमित ठाकरे व आशिष शेलार यांच्यात स्वतंत्र चर्चा झाली. काल राज ठाकरे यांनी फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर आज ही भेट झाली आहे. » पान २ वर

**उध्दव ठाकरेंना आमंत्रण**

आशिष शेलार यांना गणेशोत्सवाला आमंत्रित केल्याचे अमित ठाकरे यांनी सांगताच उध्दव ठाकरे यांना आमंत्रण दिले का, असा सवाल अमित ठाकरे यांना विचारण्यात आला तेव्हा ते मोठे सरप्राईज आहे असे त्यांनी उत्तर दिले.

## मुंबई-गांधीनगर वंदे भारतला गुजरातमध्ये आणखी एक थांबा

■ मुंबई

**मुंबई-गांधीनगर** वंदे भारत एक्स्प्रेस पुन्हा एकदा वादात अडकली. या गाडीला पालघर येथे थांबा देण्याऐवजी वलसाड येथे थांबा दिल्याने महाराष्ट्रातून आक्षेप नोंदवण्यात आले होते. त्याला महिना उलटत नाही तोच या गाडीला गुजरातमध्ये आणखी एक थांबा देण्यात आल्याने वाद निर्माण झाला आहे. या गाडीला वलसाडपासून ३९ किलोमीटर अंतरावरील नवसारी येथे नवा थांबा देण्यात आला आहे. नवसारी रेल्वे स्थानक सुरतपासून २९ किलोमीटर अंतरावर आहे. गेल्या ३ वर्षात गुजरातमधील हा चौथा थांबा आहे. मात्र पालघर जिल्हा दुर्लक्षित राहिला आहे. गुजरातमध्ये ६८ किलोमीटर अंतरात सुरत, नवसारी आणि वलसाड ही ३ स्थानके येतात. दुसरीकडे पालघरला फाटा दिल्यामुळे बोरीवली ते वापी हे १४० किलोमीटरचे अंतर नॉनस्टॉप आहे. पालघर, डहाणू आणि बोईसर यांसारखी प्रमुख औद्योगिक केंद्र असूनही पालघरला डावलण्यात आले, अशी महाराष्ट्रातील प्रवाशांची भावना आहे.

## कोल्हापूरच्या सिद्धार्थनगरमध्ये दोन गटांत दंगल! जाळपोळ! ७ जखमी

■ कोल्हापूर

**कोल्हापूरच्या** सिद्धार्थनगर-राजेबागस्वार परिसरात काल स्थानिक मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त लावलेल्या साऊंड सिस्टमवरून झालेल्या वादातून रात्री दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाली. दोन गटांतील तरुणांनी एकमेकाविरोधात दगडफेक केली. वाहनांची तोडफोड, जाळपोळही करण्यात आली. जमावाला नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. त्यानंतर या परिसरात तणाव निर्माण झाला होता. या घटनेत चार युवक आणि तीन पोलीस जखमी झाले असून एक वाहन



पेटवण्यात आले. पाच वाहनांची मोडतोड करण्यात आली.

सिद्धार्थनगर परिसरातील एका स्थानिक मंडळाचा काल वर्धापन दिन होता. त्यानिमित्त मोठी साऊंड सिस्टम लावल्याने सिद्धार्थ नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर अडथळा निर्माण झाला होता. यासोबतच परवानगी न घेता मोठे डिजिटल बोर्ड लावण्यात » पान २ वर

## मंत्री सामंत व शरद पवारांची नाट्य परिषदेसंदर्भात बैठक

■ मुंबई

**उद्योगमंत्री** उदय सामंत यांनी आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांची सिल्व्हर ओक निवासस्थानी भेट घेतली. यावेळी अखिल भारतीय नाट्य परिषदेची शरद पवारांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला संस्थेचे कोषाध्यक्ष व विश्वस्त उपस्थित होते.

बैठकीनंतर उदय सामंत म्हणाले की, आज शरद पवार हे नाट्य परिषदेचे मुख्य विश्वस्त आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या कामकाजावर आज चर्चा झाली. येत्या ११ सप्टेंबर रोजी यशवंत नाट्य मंदिरात विश्वस्तांची बैठक होणार असून, त्यानंतर विश्वस्त आणि नियामक मंडळाची बैठक पवार यांच्या अध्यक्षतेखाली होईल. या बैठकीमागे कोणतेही राजकीय हेतू नाही. गडकरी खंडातील राजसैन्य नाटक वगळण्याबाबत माझ्याकडे माहिती नाही. मराठा आरक्षणावर ते पुढे म्हणाले की, मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या मागण्या सरकारसमोर आहेत. ओबीसी समाजावर कुठेही अन्याय होणार नाही, याची काळजी सरकार घेईल. जरांगेंच्या मागण्या असोत किंवा मराठा समाजाच्या उन्नतीच्या मागण्या असोत, त्या सकारात्मक पद्धतीने पुढे नेता येतील यावर सरकार विचार करेल.

## मालवणीच्या टाऊनशिप शाळेचे खासगीकरण वर्षा गायकवाड यांचे निषेध आंदोलन

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिकेच्या मालवणी टाऊनशिप शाळेच्या खासगीकरणाविरोधात आज मुंबई काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात आले . मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड आणि स्थानिक आमदार अस्लम शेख यांनी आज पालक आणि काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांसोबतच शाळेबाहेर आंदोलन केले. त्यामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता.



मुंबईतील मालाड येथील मुंबई महानगरपालिकेच्या मालवणी टाऊनशिप शाळेच्या खासगीकरणाच्या निषेधार्थ आज मुंबई काँग्रेसने आंदोलन केले. आज टाऊनशिप शाळेत मंत्री मंगलप्रभात लोढा यांचा कार्यक्रम होता. यासाठी लोढा शाळेत दाखल होताच पालक आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाले. लोढा हे पालक आणि शिक्षकांची बैठक घेणार होते. मात्र, वर्षा गायकवाड आणि अस्लम शेख यांना आतमध्ये जाऊ दिले जात नव्हते. काही पालकांना आत सोडले, तर » पान २ वर

## अंतराळ स्थानकाची निर्मिती करणार! नरेंद्र मोदींची घोषणा

■ नवी दिल्ली

**अंतराळ** क्षेत्रात भारत एकामागोमाग भराऱ्या घेत आहेत. त्यात पुढचे पाऊल टाकत भारत लवकरच आपले स्वतःचे अंतराळ स्थानकही तयार करेल, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केली. ते आज नवी दिल्लीत राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात दूरदृश्य प्रणालीद्वारे बोलत होते.

मोदी म्हणाले की, दोन वर्षांपूर्वी भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचून एक इतिहास घडवला आहे. आम्ही अंतराळात डॉकिंग व अनडॉकिंगची क्षमता मिळवली आहे. यावर्षीची अंतराळ दिनाची संकल्पना आर्यभट्ट ते गगनयान अशी आहे. यामध्ये भूतकाळाचा आत्मविश्वास आहे, त्याचप्रमाणे भविष्याचा संकल्प आहे. आज आम्ही पाहतो की, अगदी कमी कालावधीत राष्ट्रीय अंतराळ दिन युवकांमध्ये उत्साह व आकर्षणाचा विषय झाला आहे. देशासाठी ही गौरवाची गोष्ट आहे. अंतराळ क्षेत्रात एका पाठोपाठ एक यश मिळवणे हे भारतीय अंतराळवीरांचा जणू स्वभाव झाला आहे. दोन वर्षांपूर्वीच भारताने चंद्रावर यान पाठवून इतिहास घडवला. » पान २ वर

## उत्तराखंडमधील धरालीनंतर मध्यरात्री थरालीत ढगफुटी

**मातीचे ढिग घरात शिरले**

■ डेहराडून

**उत्तराखंडमध्ये** नैसर्गिक आपत्तींचा मारा थांबताना दिसत नाही. काल मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास उत्तरकाशीतील चमोलीच्या थरालीमध्ये ढगफुटी झाली. रात्रीचा मिट्ट अंधार आणि धो धो पडणाऱ्या पावसामुळे ठिकठिकाणी दरडी कोसळू लागल्या. त्यामुळे एकच हाहाकार माजला. ५ ऑगस्ट रोजी चमोली जिल्ह्यातीलच धराली येथे ढगफुटी होऊन अनेक जण मृत्युमुखी



पडले होते.

काल थरालीत डोंगराळ भागांत मुसळधार पावसामुळे पाण्याच्या लोंढ्यांसह वाहत येणारे दगड-मातीचे ढीग घरांमध्ये शिरल्याने माणसांना घराबाहेर पडणे भाग पडले. या सर्व पडझडीत अनेक घरांचे नुकसान झाले. तसेच एक पुरुष आणि महिला बेपत्ता झाले आहेत. ढगफुटीमुळे पिंडर नदी दुथडी भरून » पान २ वर

## मतदार हक्क यात्रेदरम्यान राहुल गांधी उतरले शेतात

■ कटिहार

**काँग्रेस** खासदार राहुल गांधी यांची मतदार अधिकार यात्रा मतांच्या चोरीविरोधातील एक ऐतिहासिक चळवळ असल्याचे काँग्रेस नेते वेणुगोपाल यांनी समाजमाध्यमावर म्हटले आहे. राहुल गांधी यांनी आज कटिहारमधील मखान्याची लागवड पाहण्यासाठी थेट शेतात जाऊन तेथील लोकांशी संवाद साधल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

राहुल गांधी यांच्या मतदार अधिकार यात्रेचा आज सातवा दिवस असून त्यांच्याबरोबर राजदचे नेते तेजस्वी यादवही उपस्थित होते. यावेळी वाटेत त्यांना » पान २ वर

## टिकटॉक अनब्लॉक नाही केंद्र सरकारचे स्पष्टीकरण

■ नवी दिल्ली

**भारतात** चिनी व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म टिकटॉकची वेबसाइट ५ वर्षांनी अचानक अनब्लॉक झाली अशी बातमी समाज माध्यमांवर फिरत आहे. या संदर्भात केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की, टिकटॉक आणि इतर ५९ चिनी पवरील बंदी कायम आहे. काही समाजमाध्यमांवर या ॲपवरील बंदी उठवली, अशी खोटी बातमी पसरवली जात आहे.

२०२० मध्ये गलवान खोऱ्यात भारत-चीन संघर्षानंतर सरकारने टिकटॉक, वीचॅट, हेलो यांसारख्या ५९ चिनी पवार बंदी घातली होती. यापूर्वीच चिनी कंपन्यांच्या गुंतवणुकीवर निर्बंध लादण्यात आले होते. सरकारने स्पष्ट केले होते की, या प्समार्फत वापरकर्त्यांची माहिती चीन सरकारला मिळू शकतो ज्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वाला आणि सुरक्षेला धोका निर्माण होतो. तेव्हापासून आजवर भारतात चिनी पवार बंदी घालण्यात आली. सध्या वापरकर्त्यांना या प्लॅटफॉर्मच्या केवळ होमपेजवरच जाता येते. टिकटॉक आणि अलीएक्सप्रेसचे प्स गुगल प्ले स्टोअर व पल प स्टोअरवर उपलब्ध नाहीत. शीनचे प इन्स्टॉल करता येते, पण त्यावरील सेवा मर्यादित आहेत.








# वक्रतुंड महाकाय

भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून आपण दहा दिवसांचा गणेशोत्सव साजरा करतो. गणेशाचा उत्सव साजरा करण्यामागे गणेशाचे गुण श्रद्धेने आणि शुद्ध भावना ठेवून आत्मसात करणे, हेच कारण आहे. 'वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ। निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येशु सर्वदा' अशा शब्दांत धर्मशास्त्रात गणेशाचे वर्णन केले आहे. याचा अर्थ, ज्याची सोंड वक्र आहे, ज्याचे शरीर महाकाय आहे, जो कोटी-कोटी सूर्यांइतका तेजस्वी आहे, अशा सर्वकाही प्रदान करण्यास सक्षम असणाऱ्या गणेशाने माझ्या सर्व विघ्नांचा नाश करावा.

**गणेशाचे पूजन म्हणजेच गणेशाचे गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न होय. मातापित्याच्या आज्ञा शिरसावंद्य मानणे, प्रामाणिकपणे सत्कार्य करीत राहणे, उपलब्ध वस्तूंचा सावधगिरीने वापर करणे, हे गणेशाचे गुण आत्मसात केल्यास व्यापारउदीम तसेच नोकरीव्यवसायात व्यक्ती यशस्वी होते. तसेच क्षेम म्हणजे मिळालेल्या लाभाचे रक्षण करण्याची शक्तीही गणेशाच्या उपासनेमुळे लाभते, असे शास्त्रांत म्हटले आहे. गणेशाचे गुण आत्मसात करणाऱ्या व्यक्तीची बुद्धी शुद्ध राहते आणि त्यामुळेच ज्ञान, सुख, धन, वैभव, ऐश्वर्य यांची प्राप्ती होते. कार्यारंभी गणेशाचे पूजन करण्यामागेही सद्भावना आणि श्रद्धा याच गोष्टी महत्त्वाच्या मानल्या गेल्या आहेत. कोणतेही काम श्रद्धेने केल्यास ते तडीस जाते, अशी भावना त्यामागे आहे.**

श्री रामचरितमानसात पार्वतीला श्रद्धेचे आणि महादेवाला विश्वासाचे रूप मानले गेले आहे. हे दोघे गणेशाचे माता-पिता आहेत. अर्थात, श्रद्धा आणि विश्वास यांचा संगम म्हणजे श्री गणेश होय. कोणतेही कार्य करताना शुद्ध भाव आणि प्रामाणिकपणा मनात सातत्याने असावा, यासाठीच गणेशाचे स्मरण करून कार्यारंभ केला जातो. प्रत्येक मंत्राची सुरुवात ओमकाराने होते, तद्वत् प्रत्येक कार्याचा आरंभ श्री गणेशाच्या स्मरणाने होतो.

जे भक्त गणेशाची उपासना करतात, त्यांच्या कार्यात कधीही विघ्न येत नाही, असे स्कंद पुराणात म्हटले आहे. विघ्नांचा नाश करणाऱ्या गणेशाला वंदन करताना गणेभ्योगणपतिभ्वयश्रवो नमो नमः' असे म्हटले आहे. गण आणि गणांचा स्वामी श्रीगणेशाला वंदन, असा याचा अर्थ आहे. हिंदू धर्मशास्त्रात गणेशाच्या विविध रूपांचे वर्णन आढळते. परंतु ही सर्व रूपे विघ्नविनाशक असल्याचे सर्वांनीच म्हटले आहे. वराह पुराणात आणि लिंग पुराणात म्हटले आहे की, एकदा असुरी शक्तींमुळे त्रस्त झालेल्या ऋषिमुनींनी भगवान शंकराकडे मदतीची याचना केली. भगवान आशुतोषाने विनायक रूपातील गणेशाला प्रकट केले तसेच आपले शरीर कंपित करून अनेक गणांची सृष्टी निर्मिली आणि त्यांचा अधिपती म्हणून श्रीगणेशाची नियुक्ती केली.

गण या शब्दाचा अर्थ राज्य असाही होतो. गणेश हा सर्व गणांचा स्वामी आहे. गणेशाने जन्मानंतर सर्व गणांना एकत्र केले आणि त्यांचे यशस्वीरीत्या नेतृत्व केले. अनेक दानवांचा अंत केला. सर्वांना सोबत घेऊन कार्यरत राहणे हेच गणेशाचे लक्ष्य होते. कार्तिकस्वामी हा सेनापती होता, तर गणेश बुद्धिमत्ता आणि युक्तीच्या आधारे देवशक्तींना संघटित करण्याचे कार्य करीत असे. बुद्धिचातुर्य आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे जे कार्य गणेशाने केले, ते अद्वितीय असून, गणेशापासून हे गुण आपण घेतले पाहिजेत.

गणेशाच्या अनेक पौराणिक कथा आपल्याला अशाप्रकारे मार्गदर्शन करणाऱ्या आहेत. पार्वतीने गणेशाला द्वारपालाची जबाबदारी सोपविली आणि कशाचीही तमा न बाळगता गणेशाने आपली जबाबदारी पूर्ण केली. प्रसंगी गणेशाने प्राणांचीही पर्वा केली नाही आणि त्याचे फळ म्हणूनच श्री गणेशाला अग्रपूजेचा मान मिळाला. माता-पित्यांच्या आज्ञेचे पालनच मुलांचे सर्वांत प्राथमिक कर्तव्य आहे, ही शिकवण गणेशाकडून आपल्याला मिळते.

श्री गणेश हा बुद्धीचा आणि विद्येचा देव आहे. आपल्याकडे आजही शिक्षणाची सुरुवात श्री गणेशाचे नाव पाटीवर लिहून केली जाते. कोणत्याही कार्याचा प्रारंभ श्री गणेशाच्या स्मरणाने करण्याची प्रथा आहे. इतकेच काय कार्यारंभालाच आपण 'श्रीगणेशा' म्हणतो. श्री गणेशाचे स्मरण करून घेतलेली विद्या सात्त्विक कार्यांसाठी उपयोगात येते, असे आपण मानतो.

धर्मशास्त्रानुसार श्री गणेशाचे स्मरण करून सुरू केलेल्या कार्यात विघ्ने येत नाहीत, तसेच आपल्या सर्व मनोकामनाही पूर्ण होतात. शास्त्रानुसार गणेशाला अर्पण करण्यात येणाऱ्या गोष्टींमध्ये दुर्वांना विशेष महत्त्व आहे. अथर्वशीर्षात म्हटले आहे की, गणेशाच्या पूजेची सुरुवात जी व्यक्ती दुर्वांकुराने करते, ती कुबेराप्रमाणे संपन्न होते. त्या व्यक्तीच्या घरी धनधान्याची उणीव कधीही जाणवत नाही. गणेशाला प्रिय असलेल्या मोदकाचा नैवेद्य दाखविल्यास व्यक्तीच्या मनोकामना पूर्ण होतात, असेही सांगितले गेले आहे. मोदकात ब्रह्म असून त्यातही अमृताचा अंश आहे, अशी मान्यता आहे.



**● सुनिल हिंगणे,** अध्यात्म अभ्यासक

श्री गणेशाने ठार केलेल्या राक्षसांमध्ये अहंतासुर, कामासुर, क्रोधासुर, मायासुर, लोभासुर आदींचा समावेश आहे. अहंतासुर अहंकाराचे, कामासुर कामाचे, क्रोधासुर क्रोधाचे, मायासुर मायेचे तर लोभासुर हे लोभांचे प्रतीक आहे. गणेशाचे पूजन आपल्याला अहंकार, काम, क्रोध, माया आणि लोभापासून मुक्त ठेवते, अशी धारणा त्यामुळेच आहे. हे सर्व मनुष्याच्या आत वसलेले मनुष्याचे शत्रू आहेत. गणेशाने असुरांचा नाश करण्यासाठी अंकुश या शस्त्राचा वापर केला आहे. आपण आपल्या आत असलेल्या कामक्रोधादी शत्रूंवर अंकुश ठेवला पाहिजे, हाच यातील संदेश होय.

गणेश चतुर्थीला भल्या सकाळी नदीकाठी स्नान करून तेथील अथवा शेतातील माती चाळून त्यात पाणी मिसळून त्यापासून गणेशाची मूर्ती स्वतःच्या हाताने तयार करावी, असे सांगितले गेले आहे. गणेशाला त्या मूर्तीमध्ये विराजमान होण्यासाठी आवाहन करावे आणि नंतर त्याची पूजा करावी, असे शास्त्र सांगते. गणेशोत्सवात आपण मातीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून दहा दिवस या मूर्तीची पूजा करतो. दहा दिवसांनंतर ही मूर्ती नदीत विसर्जित केली जाते. गणेशाचे निर्माल्य नदीत विसर्जित करू नये. तसेच गणेशाला दाखविला गेलेला नैवेद्य मुलांना वाटावा आणि तद्नंतर कुटुंबासमवेत स्वतः ग्रहण करावा. दहा दिवस अशाप्रकारे उपासना केल्यावर विघ्नहर्त्या गणरायाचा आशीर्वाद लाभतो, असे शास्त्र सांगते. गणेशाचे दहा दिवस पूजन करणे म्हणजेच त्याचे गुण आत्मसात करणे. गणेश हा गुणांचा अधिपती आहे. कलांची देवता आहे. बुद्धीचे दैवत आहे. गणेशोत्सवानिमित्त त्याची पूजा करताना आपण त्याचे गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न करूया.

> श्री गणेशाचे शिर हत्तीचे आहे. घरातील कर्त्या व्यक्तीने हत्तीप्रमाणे गंभीर आणि दूरदर्शी असणे अपेक्षित आहे. हत्तीप्रमाणेच कोणतीही कृती खूप विचारपूर्वक करणे अपेक्षित आहे. जबाबदार व्यक्तीने हत्तीसारखेच शांत आणि संयमी राहायला हवे. अर्थात, क्रोधावर नियंत्रण मिळवायला हवे. धैर्य असल्याखेरीज कोणतेही कार्य तडीस जाऊ शकत नाही. धैर्य आणि संयमाची शिकवण मंगलमूर्ती आपल्याला देतो. उंदीर हे गणेशाचे वाहन आहे. उंदीर बिळात राहतो आणि विशिष्ट हेतूनेच बाहेर पडतो. त्याप्रमाणे आपल्या योजना गुप्त ठेवून कार्यसिद्धी झाल्यावरच ते प्रकट करावे, अशी शिकवण मूषकाच्या माध्यमातून आपल्याला मिळते. अशा प्रकारे कार्यरत राहिल्यास कुटुंबाची प्रगती होते.






# निवडणूक आयुक्तांचे 'कवच' भेदताना...

बिहारमध्ये येत्या काही महिन्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार असून तेथेही हाच धागा पकडत काँग्रेस पक्ष आणि लालूंच्या राष्ट्रीय जनता दलाने निवडणूक आयोगावर आरोपांची राळ उडवण्यास सुरुवात केली आहे. तेथे एसआयआर म्हणजे स्पेशल इंटेंसिव रिव्हिजन हा मुद्दा केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे. खरंतर ही एक मतदार यादीत सुधारणा करण्याची प्रक्रिया आहे. परंतु या विषयावर विरोधक सतत निदर्शने करत आहेत. अलीकडेच २५ विरोधी पक्षांचे ३०० पेक्षा जास्त खासदारांनी दिल्लीत एसआयआर आणि २०२४ च्या लोकसभेच्या निवडणुकांदरम्यान 'मतदार फसवणूक' या मुद्द्यांच्या अनुषंगाने जोरदार निदर्शने केली. या दरम्यान राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनाही ताब्यात घेतले गेले. विरोधकांचे म्हणणे आहे की, एसआयआर हे सत्ताधाऱ्यांचे सुनियोजित षड्यंत्र आहे. याद्वारे लाखो लोकांची नावे मतदार यादीतून वगळली जात आहेत. तसेच ही प्रक्रिया पारदर्शक नसून विशेष समुदाय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यामुळे प्रभावित होतील. . बिहारमध्ये 'वोटर अधिकार यात्रा' दरम्यान राहुल गांधींनी आरोप केला की, २०२३ मध्ये कायद्यांत बदल करून मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांना कायदेशीर कारवाईच्या व्याप्तीतून मुक्त केले गेले, कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांना 'वोट चोरी'मुळे निवडणूक आयोगाविरुद्ध कोणतीही कारवाई होऊ द्यायची नव्हती.



**● पोपट नाईकनवरे,** राज्यशास्त्र अभ्यासक

विरोधकांच्या या आरोपांवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनीही अलीकडेच विस्तृत भाष्य करत हे आरोप पूर्णपणे निराधार असल्याचे सांगितले आहे. त्यांनी राहुल गांधी यांचे नाव न घेता त्यांना शपथपत्र दाखल करण्याची किंवा माफी मागण्याची सूचना केली आहे. या वादामुळे विरोधक आणि निवडणूक आयोग आमनेसामने आले आहेत आणि आता काँग्रेस पक्ष मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून हटवण्याचा प्रस्ताव आणणार असल्याची चर्चा आहे.

भाजपाने राहुल गांधी यांचा घटनात्मक संस्था मोडीत काढण्याचा डाव असल्याचे म्हटले आहे; परंतु राजकारण म्हणून काँग्रेसची ही भूमिका आक्षेपार्ह म्हणता येणार नाही. मुख्य मुद्दा आहे तो म्हणजे मुख्य निवडणूक आयुक्ताबाबत राज्यघटनेमध्ये कोणत्या तरतुदी आहेत? त्यांना पदच्युत करण्याची वेळ आल्यास त्यासाठी कोणती प्रक्रिया पार पाडावी लागते?

भारतीय लोकशाहीत मुख्य निवडणूक आयुक्ताचे पद स्वतंत्र आणि स्वायत्त मानले जाते. संविधानातील कलम ३२४ मध्ये हे स्पष्ट करण्यात आले आहे की, देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त पूर्णपणे स्वतंत्र राहतील आणि कोणत्याही प्रकारच्या राजकीय दबावापासून मुक्त राहून आपले काम करतील. त्यांच्या खांद्यावर स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुका घेण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या स्वायत्ततेचे रक्षण करण्यासाठी संविधानाने कडक तरतुदी केल्या आहेत. अनुच्छेद ३२४(५) नुसार, मुख्य निवडणूक आयुक्ताला हटवण्याची प्रक्रिया आणि आधार अगदी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला हटवण्यासारखाच आहेत. यामुळे या पदाला संविधानिक सुरक्षा प्राप्त आहे. त्यामुळे त्यांना साध्या बहुमताने हटवता येत नाही, यासाठी विशेष कायदेशीर प्रक्रिया अनुसरावी लागते, जी संसदेतून सुरू होते.

एखाद्या खासदाराला मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध गैरवर्तन किंवा अकार्यक्षमतेचा आरोप करायचा असेल तर यासाठीचा विशेष प्रस्ताव लोकसभा किंवा राज्यसभा या दोन्हींपैकी कुठल्याही सभागृहात मांडला जाऊ शकतो. मात्र लोकसभेत किमान १०० खासदार आणि राज्यसभेत किमान ५० खासदारांच्या स्वाक्षऱ्या या प्रस्तावावर असणे आवश्यक असते. प्रस्ताव स्वीकारल्यानंतर लोकसभा अध्यक्ष किंवा राज्यसभा सभापती तीन सदस्यीय तपास समितीची स्थापना करतात. यासमितीमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे एक न्यायाधीश अध्यक्ष म्हणून असतात, त्यांच्यासोबत उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि एक नामांकित विधिज्ञ यांचा समावेश केला जातो. ही समिती सर्व आरोपांची चौकशी करून अहवाल सादर करते.

समितीच्या अहवालात जर मुख्य निवडणूक आयुक्त दोषी ठरले तर तो प्रस्ताव पुन्हा संसदेत चर्चेसाठी आणला जातो. मात्र त्यावेळी प्रस्ताव मंजूर करण्यासाठी सामान्य बहुमत पुरेसे नसते. संपूर्ण सभागृहाच्या बहुमतासोबतच उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन-तृतीयांश बहुमताने प्रस्ताव पारित करणे आवश्यक असते. याला 'विशेष बहुमत' असही म्हणतात. हा प्रस्ताव प्रथम एका सभागृहात मंजूर झाल्यानंतर दुसऱ्या सभागृहात देखील त्याच प्रक्रियेतून पारित करावा लागतो. यानंतर राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतरच मुख्य निवडणूक आयुक्त पदावरून हटवले जाऊ शकतात.

इतिहासावर नजर टाकल्यास भारतात आजवर कोणत्याही मुख्य निवडणूक आयुक्ताला या कठीण प्रक्रियेतून हटवण्यात आलेले नाही. मात्र २००६ साली तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त एन. गोपालस्वामी यांनी निवडणूक आयुक्त नवीन चावला यांना पक्षपाती ठरवत त्यांना बरखास्त करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यावेळी भाजपाने प्रस्तावही मांडला होता, परंतु तत्कालीन लोकसभा अध्यक्ष सोमनाथ चटर्जी यांनी तो प्रस्ताव फेटाळून लावला होता.

> **मुख्य निवडणूक आयुक्त स्वतःहूनही पदाचा राजीनामा राष्ट्रपतींना पत्राद्वारे देऊ शकतात. निवडणूक आयोग अधिनियम १९९१ मध्ये त्यांच्या कार्यकाळाबाबत स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार निवडणूक आयुक्तांना आपल्या सहा वर्षांच्या कार्यकाळात किंवा वयाची ६५ वर्षे पूर्ण होण्याच्या आधी केवळ स्वतःच्या इच्छेने राजीनामा देऊनच हे पद सोडता येते.**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना हटवण्याची प्रक्रिया अनुच्छेद १२४(४) मध्ये स्पष्ट केली आहे. न्यायाधीश (चौकशी) अधिनियम १९६८ अंतर्गत या प्रक्रियेचे नियम घालण्यात आले आहेत. यानुसार कोणत्याही न्यायाधीशांना किंवा मुख्य निवडणूक आयुक्तांना केवळ राष्ट्रपतींच्या आदेशानेच हटवता येते. मात्र राष्ट्रपतींना आदेश देण्यापूर्वी संसदेतून दोन्ही सभागृहांमध्ये विशेष बहुमताने ठराव मंजूर व्हावा लागतो.

'सिद्ध गैरव्यवहार' या संज्ञेला संविधानात स्पष्ट परिभाषा दिलेली नसली तरी भ्रष्टाचार, नैतिक अधःपतन, पदाचा दुरुपयोग किंवा वारंवार झालेली गंभीर बेपर्वाई यांना यांसारख्या कृत्यांचा या श्रेणीत समावेश होतो; तर 'अकार्यक्षमता' याचा अर्थ शारीरिक किंवा मानसिक कारणामुळे कार्य करण्यास असमर्थ होणे असा घेतला जातो. यावरून स्पष्ट होते की केवळ राजकीय वाद, आरोप किंवा असमाधानामुळे देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवणे शक्य नाही. हेच संविधानाचे कवच आहे. भारतातील लोकशाहीची स्वायत्तता आणि निवडणूक आयोगाची निष्पक्षता यांचे रक्षण करत आले आहे. पण सद्यस्थितीत विरोधकांनी आपली सर्व ताकद या मुद्द्यावर पणाला लावली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात यासंदर्भातील तरतुदींचा किस पाडला जाताना पहावयास मिळेल. या सर्वांमुळे घटनात्मक पदांच्या गरीमेला धक्का बसणार असला तरी यानिमित्ताने होणाऱ्या कायदेशीर घुसळणीतून, राजकीय डावपेचातून लोकशाही अधिक परिपक्व होईल अशी अपेक्षा बाळगूया.





# नवीन आर्थिक सुधारणांच्या मार्गावर

अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थतज्ज्ञ आणि वरिष्ठ मंत्र्यांसमवेत बैठक घेत नवीन आर्थिक सुधारणांच्या मसुद्यावर चर्चा केली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आकारलेल्या ५० टक्के शुल्कवाढीचा प्रभाव कमी करण्यासाठी सरकार ॲक्शन मोडवर आले आहे. सरकारच्या विविध मंत्रालयांकडून पुढील शंभर दिवसांत घेण्यात येणाऱ्या संभाव्य आर्थिक निर्णयावर काम करण्यास सुरुवात केली आहे. यात चीनसमवेत व्यापारी संबंधात मवाळपणा आणणे, ई-कॉमर्स एक्स्पोर्ट हबचा प्रारंभ करणे, चर्मोद्योगासाठी पर्यावरणाच्या नियमात शिथिलता आणणे, स्टार्टअपच्या करात आणखी सवलत देणे, तंबाखू आणि फार्मा व्यापार करणाऱ्यांसाठी नोंदणी नुतनीकरणाची कालमर्यादा वाढविणे आणि औद्योगिक मंजुरीच्या पोर्टलला आणखी अपडेट करणे यासारख्या निर्णयाचा समावेश आहे.

या काळात केंद्र सरकारकडून वस्तू व सेवा कर (जीएसटी) आणि इनकम टॅक्स कायद्यात आमूलाग्र बदल करून लोकांना मोठा दिलासा देण्याचे आणि अर्थव्यवस्थेला वेग देण्याचे प्रभावी पाऊल पुढे टाकले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त जीएसटीमध्ये मोठ्या बदलांची घोषणा केल्यानंतर केंद्राने पुढील पिढीतील जीएसटी सुधारणांचा मसुदा राज्यांना पाठविला आहे आणि तो लवकरात लवकर लागू करण्यासाठी त्यांचा सहकार्यही मागितले आहे. २० आणि २१ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथे जीएसटी कौन्सिलने स्थापन केलेल्या मंत्रिगटाच्या बैठकीत वैयक्तिक जीवन व आरोग्य विमा पॉलिसीला जीएसटीतून सूट देण्याच्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यात आला आहे. त्याचबरोबर दोन स्लॅब असलेल्या जीएसटीला मान्यता देण्यात आली आहे. याचप्रमाणे सरकार इनकम टॅक्स कायदा सोपा व दिलासा देणारा करण्यासाठीही जलद गतीने पुढे सरसावलेली आहे. नुकतेच ११ ऑगस्ट रोजी लोकसभेत पारित झालेला इनकम टॅक्स बिल २०२५ आता राज्यसभेत मंजूर होऊन राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीअंती कायदा बनेल. विशेष म्हणजे केंद्र सरकारने मागील तीन वर्षे व्यापक मूल्यमापन व विश्लेषण केल्यानंतर जीएसटीमध्ये सुलभीकरणाचा प्रस्ताव तयार केला आहे. सरकारने विद्यमान चार कर श्रेणी ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के यात बदल करून त्यांना घटवून ५ टक्के आणि १८ टक्के या दोन-स्तरीय जीएसटी स्लॅबचा प्रस्ताव केला आहे. मात्र अहितकर वस्तूंच्या गटातील काही वस्तूंवर ४० टक्के कर श्रेणी लागू राहणार आहे. आता जीएसटी सुधारांचे तीन मोठे आधारस्तंभ असतील.

पहिला म्हणजे स्ट्रक्चरल सुधार. यात कररचना आणखी चांगली केली जाईल. दुसरा, कर दरांना तर्कसंगत करणे, जेणेकरून आवश्यक वस्तू स्वस्त होतील आणि तिसरा, नवीन रजिस्ट्रेशन व रिफंड सुलभ करणे. यामुळे इनपुट आणि आउटपुट कर दरांत संतुलन येईल. १२ टक्क्यांच्या गटात येणाऱ्या बहुसंख्य वस्तू ५ टक्के कर श्रेणीत येतील. उपकर (सेस) रद्द होईल. जीएसटी आणि इनकम टॅक्स कायद्यातील सुलभीकरणाचा फायदा देशातील कोट्यवधी लोकांना मिळेल आणि भ्रष्टाचारावरही नियंत्रण ठेवता येईल. महत्त्वाच्या कर सुधारांमुळे करदात्यांची संख्या वाढविण्यात, कर जटिलता व खटले कमी करण्यात आणि कर संकलन वाढविण्यात होईल अशी अपेक्षा आहे. यातून झपाट्याने वाढणारे करसंकलन देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्यातही निर्णायक भूमिका बजावताना दिसेल. भारताच्या हालचाली पाहता ट्रम्प यांच्या शुल्कवाढीच्या आव्हानात आपण रणनितीपूर्वक वाटचाल करत आहोत, हे स्पष्ट होते. भारत सध्या जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेपैकी एक आहे. गेल्या अकरा वर्षात भारत जागतिक अर्थव्यवस्थेत दहाव्या स्थानावरून पहिल्या पाच स्थानांवर पोचला आहे आणि आता तो टॉप-३ कडे पावले टाकत आहे. अर्थात ही गती भारताला सुधारणा, कामगिरी आणि बदल या आधारावर मिळाली आहे. प्रामुख्याने भारताकडे जगातील सर्वात मोठी तरुण लोकसंख्या आहे. शिवाय सर्वात मोठी लोकशाही, स्टार्टअप्स, इनोव्हेशन आणि रिसर्च इकोसिस्टिम, सर्वात वेगाने वाढणारा बाजार. भारत उत्पादन व सेवा क्षेत्रात उच्चांक प्रस्थापित करत असताना जगातील देश आपल्यासमवेत व्यापार आणि व्यवहार करण्यासाठी तसेच 'एफटीए'साठी उत्सुक राहत आहेत. विशेष म्हणजे एकीकडे अमेरिकेसमवेतच्या व्यापारी करारात भारताने कठोर भूमिका घेतल्याने अस्वस्थ झालेले अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ३१ जुलै रोजी भारतीय अर्थव्यवस्था मृत असल्याचे सांगितले होते. त्याचवेळी विविध आंतरराष्ट्रीय अहवालाचे आकलन केले तर भारत जगाच्या विकासात १६ टक्के योगदान देत असल्याचे उघड होते. शिवाय यावर्षी भारत जगातील चौथ्या क्रमाकांचा अर्थव्यवस्था असलेला देश होईल. अशीच घोडदौड सुरू राहिली तर २०२७ पर्यंत भारत जगातील तिसऱ्या क्रमाकांच्या अर्थव्यवस्थेचा देश होईल, असेही म्हणायला हरकत नाही.



**● डॉ. जयंतीलाल भंडारी,** ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

जागतिक आर्थिक संघटना भारताच्या वेगवान विकासाबाबत सकारात्मक अहवाल मांडत असतील तर ती बाब साधी नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने सदस्य देशांसंदर्भात नवीन अंदाज जारी केले. यात म्हटल्यानुसार भारताच्या जीडीपी वाढीचा दर २०२६-२७ मध्ये ६.४ टक्के राहण्याचा अंदाज आहे. हा अंदाज पुर्वीच्या तुलनेत थोडा जास्त आहे. पुढील आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी विकासाच्या अंदाजाला ०.१ टक्के म्हणजेच दहा टक्के बेसीस पॉइंटने वाढवत ६.५ टक्के केला आहे. यावरुन भारताची अर्थव्यवस्था किती वेगाने वाढत आहे, हे समजते.

जागतिक बँकेने म्हटल्यानुसार, सध्या जागतिक पातळीवर अनिश्चितता असतानाही आणि निर्यातीवर दबाव असतानाही भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारा प्रमुख देश म्हणून ओळखला जाईल. आशियाई विकास बँकेच्या अंदाजानुसार, भारताचा जीडीपी २०२५ मध्ये ६.५ टक्के आणि २०२६ मध्ये ६.७ टक्के दराने वाढू शकतो. भारताच्या अर्थव्यवस्थेसंदर्भात असेच विचार तीन प्रमुख रेटिंग एजन्सीज मूडीज, एसॲंडपी आणि 'फिच' संस्थांनी मांडले आहेत. एकंदरीतच भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत आहे. गुंतवणूकदारांचा विश्वास कायम आहे. अर्थव्यवस्थेची व्यापक बांधणी होत आहे. उद्योजकांसाठीच्या धोरणात सातत्य राखले जात असून प्रशासकीय सुधारणा, नवोन्मेष तसेच सर्वंकष आर्थिक धोरण अंमलात आणले जात आहे. सरकारी कर्जाचे चांगल्या रितीने व्यवस्थापन होत असल्याने महसुली तुटदेखील आटोक्यात आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण आहे. सरकारचा भांडवली खर्च वाढत असल्यानेही अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे.

देशाच्या कानाकोपऱ्यात देशांतर्गत बाजाराला 'मेक इन इंडिया' अभियानातून पाठबळ मिळत आहे. दुसऱ्या देशांतून व्यापक प्रमाणात आयात करण्यात येणाऱ्या अनेक वस्तू आता देशांतच तयार केल्या जात आहेत. स्थानिक उत्पादनाच्या वापरावर दिला जाणारा भर आणि स्थानिक श्रमाला दिली जाणारे मूल्य पाहता शहरापासून ते गावांपर्यंत स्वदेशी साहित्य खरेदीला वेग आला आहे. सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) देशाला चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था करण्यात मोलाची भूमिका बजावत आहेत. संपूर्ण जगभरात भारत सेवा निर्यातीच्या बळावर विक्रमी आघाडी घेत आहे. मात्र सध्याचा काळ हा भारतासाठी निर्णायक क्षण आहे. अमेरिकेडून जादा शुल्क आकारले जात असताना अमेरिकेची बाजारपेठ संकुचित होत आहे. अशावेळी भारत 'एफटीए'च्या माध्यमातून नवीन बाजारपेठ शोधणे आणि तेथे स्थान मिळवण्यावर वेगाने काम करत आहे.

भारत २०२७ पर्यंत जगातील तिसऱ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनवण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सरकारला आणखी काही गोष्टींवर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. आपल्याला अनेक आव्हानांचा मुकाबला करत वाटचाल करावी लागेल. जागतिक व्यापारातील तणाव, शुल्कातील वाढ, जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे तसेच व्यापारी तुट यासारख्या आव्हानांवर मार्ग काढावा लागेल. १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आर्थिक घोषणा आणि ट्रम्प यांच्या जबर शुल्कामुळे निर्माण झालेले आर्थिक आव्हाने पाहता भारत रणनितीपूर्वक प्रयत्नातून विकासाच्या पातळीवर सातत्यपूर्ण वाटचाल करताना दिसेल.

# गणेशोत्सवात सार्वजनिक हिताचा सन्मान व्हावा

गणेशोत्सव म्हटल्यानंतर उत्साह ओसंडून वाहत असतो. घरगुती गणपतीपासून ते सार्वजनिक गणेशोत्सव मंडळापर्यंत हा उत्साह वेगवेगळ्या स्वरूपात पाहायला मिळतो. संपूर्ण वर्षभरातला समाजातल्या सर्व स्तरातल्या लोकांना आणि सर्व वयोगटातल्या लोकांनादेखील एकत्र आणणारा हा एकमेव उत्सव म्हणता येईल. प्रामुख्याने या उत्सवातली स्वयंस्फूर्तता अत्यंत महत्त्वाची ठरते. गणरायावरची भक्ती, श्रद्धा आणि एकूणच आपल्या सनातन परंपरांविषयीची निष्ठा त्यात गृहित धरली गेलेली आहे. परंतु गेल्या काही वर्षात हा उत्सव साजरा करताना काही महत्त्वाच्या मुद्यांकडे दुर्लक्ष होते. विशेषतः सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून सार्वजनिक हिताचेच भान ठेवले जात नाही. ध्वनीप्रदूषणाविषयी तर दरवर्षीच काही ना काही तक्रारी येत असतात. याशिवाय गणरायांच्या मिरवणुकांमध्ये किंवा सार्वजनिक मंडपांजवळ आपल्या उत्सवाचा झगमगाट दाखवण्यासाठी लेझर किरणांचा वापर होतो. म्हणजे ध्वनीप्रदूषणाबरोबरच या लेझर किरणांचे काही घातक दुष्परिणाम समोर येऊ लागले आहेत. गेल्या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात या लेझर किरणांमुळे जवळपास पंचवीस जणांच्या डोळ्यांना इजा पोहोचणाऱ्या घटना घडल्या. अनेकांच्या मोबाईलचे स्क्रीन खराब होण्याचे प्रकार घडले होते. विशेषतः या लेझर किरणांच्या वापरामुळे पक्षांना सर्वाधिक त्रास होतो हे देखील त्यातून समोर आले आहे. मिरवणुकांमधून या लेझर किरणांचा होणारा वापर अत्यंत धोकादाक असल्याचे सिद्ध झालेले आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करूनच गणेशोत्सवामधला हा सार्वजनिक हिताचा मुद्दा दुर्लक्षित होता कामा नये. म्हणूनच गणेशोत्सव सुरू व्हायला अजून काही दिवस बाकी असतानाच गणेशोत्सवातल्या या अनावश्यक उत्साहाला योग्य वेळी निर्बंध घालणे अत्यंत आवश्यक ठरते. गणेशोत्सवामध्ये जो काही उत्साह असतो तो स्वयंस्फूर्त असतो. वेगवेगळी मंडळं आणि त्यातले कार्यकर्ते दिवस-रात्र खपून आपला उत्सव अधिकाधिक चांगल्या पद्धतीने साजरा व्हावा म्हणून प्रयत्न करत असतात. सार्वजनिक वर्गणीतून, सार्वजनिक प्रयत्नातून आणि सार्वजनिक आत्मविश्वासातून हा गणेशोत्सव अतिशय देखणा स्वरूपामध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा होत असतो. पण या उत्सवाला जर अशा प्रकारचं गालबोट लागणार असेल तर ते अत्यंत चुकीचे ठरते. किंबहुना ते सार्वजनिकदृष्ट्या मोठ्या धोक्याचा इशारा देणारे ठरते.

### लेझर लाईटींचे धोके

गणेशोत्सव हा अतिशय शांत पद्धतीने आणि भक्तिमय वातावरणामध्ये साजरा झाला पाहिजे. पूर्वी मुंबईमध्ये रोंबासोंबा नावाचे वाद्य वाजवले जायचे आणि सगळ्या उत्सवाला एक किळसवाणे स्वरूप प्राप्त झाले होते. अखेरीस मुंबईतल्याच सार्वजनिक मंडळांनी एकत्र येऊन निर्णय घेतला आणि हा रोंबासोंबाचे वाद्य बंद केले होते. म्हणजेच सार्वजनिक उत्सव हे आपल्या संस्कृतीचे निदर्शक असतात आणि संस्कृतीमधून कुठल्याही विकृतीला थारा मिळता कामा नये याची खबरदारी सगळ्यांनीच घेणे क्रमप्राप्त ठरते. ती खबरदारी घेतली जात नाही आणि तसे दुष्परिणाम आपल्याला वेगवेगळ्या पद्धतीने पाहायला मिळतात. आज तंत्रज्ञान विकसित झालेले आहे. डॉल्बीसारखे वाद्य किंवा डीजेसारखे प्रकार अत्यंत कर्कश्य पद्धतीने या उत्सवाच्या माध्यमातून ऐकवले जातात किंवा वाजवले जातात आणि त्याचे देखील दुष्परिणाम वेगवेगळ्या स्वरूपात पाहायला मिळतात. म्हणजे एकीकडे उत्सवातल्या या डॉल्बी किंवा डीजे प्रकारातून कानाच्या पडद्यांना त्रास होतो तर दुसरीकडे लेझरसारख्या प्रकारांनी डोळ्यांना इजा पोहोचते. डोळे, कान अशा महत्त्वाच्या इंद्रियांना इजा पोहोचत असेल तर त्या उत्सवाची आपण नीट काळजी घेतलेली नाही. ज्या समाजासाठी आपण उत्सव साजरा करतो त्या समाजाच्या सामाजिक आरोग्याचा आपण विचार केलेला नाही हे त्यातून सिद्ध होते. बऱ्याच वेळेला तर गणेशोत्सवाच्या मिरवणुका बराच वेळ चालतात आणि त्यामध्ये वाद्यांचा प्रचंड प्रमाणात वापर होतो. लाऊडस्पीकरही वापरले जातात. अनेक ठिकाणी रस्त्यांमध्ये रुग्णालय असतात तिथे हृदयविकाराचे रुग्ण उपचार घेत असतात. त्यांच्यासाठी हे सगळे आवाज किंवा डीजे सारखा प्रकार त्यांच्या हृदयासाठी त्रासदायक ठरतो. त्यांचं ब्लडप्रेशर वाढवणारा ठरत असतो. अशा अनेक बारीकसारीक गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

### गणरायाची उत्कृष्ट भक्ती व्हावी

उत्सवाचा मूळ उद्देश साधला गेला पाहिजे. उत्सवाच्या माध्यमातून गणरायाची अत्यंत उत्कृष्ट भक्ती आपल्याला साधता आली पाहिजे. त्याच्याऐवजी आपण जर अशा अनावश्यक गोष्टींना प्राधान्य देत असू तर आपण उत्सवाचा मूळ उद्देश लक्षात घेतलेला नाही हे स्पष्ट होते. म्हणूनच गणेशोत्सवाच्या पवित्र्याचा विचार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सार्वजनिक हिताला प्राधान्य देणे आवश्यक ठरते. यावर्षीच्या गणेशोत्सवामध्ये लेझर किरण असलेल्या लाईटांचा किंवा डॉल्बी-डीजे सारख्या वाद्य प्रकारांना अनाठायी वाव मिळणार नाही याचे भान बाळगण्याची आवश्यकता आहे. जो गणराय आपल्याला बुद्धी देतो सद्‌बुद्धी देतो, आपल्यावरची सगळी विघ्ने दूर करण्यासाठीच तो तत्पर असतो. परंतु त्या उत्सवाच्या निमित्तानेच आपण अशा प्रकारच्या विघ्नांना आमंत्रण देणारा असू तर विघ्नविनाशक गणरायाचाच आपण आदर ठेवला नाही असाच त्यातून निष्कर्ष काढावा लागतो. अन्य सगळ्या उत्सवांपेक्षा यात सहभागी होणाऱ्यांची संख्या प्रचंड असते. अगदी छोट्या छोट्या गावांपासून ते मोठ्या मोठ्या शहरांमध्ये दहा दिवस गणेशभक्तांचे जथ्थेच्या जथ्थे दर्शनासाठी बाहेर पडत असतात. ज्या उत्साहाने आणि श्रद्धेने भक्त तिथे येतात, तिथे त्यांना मूर्तीचे दर्शन आणि उभारलेल्या देखाव्यांचा किंवा उपक्रमांचा आनंद घेता आला पाहिजे. भपकेदार रोषणाई आणि कानठळ्या बसवणारे लाऊडस्पीकरचे आवाज उत्सवासाठी आवश्यक असलेले शालिनता आणि सौजन्य नाहीसे करतात. अशा सार्वजनिक गणेशोत्सवात सार्वजनिक हिताचे केवळ भानच नाही तर सन्मानही ठेवला गेला पाहिजे.

## सुविचार


**विलास कोळेकर**

खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**जगातलं सर्वात चांगलं टॉनिक म्हणजे जबाबदारी. ते एकदा घेतलं की माणूस वाट चुकत नाही. आयुष्यभर थकत नाही आणि आपले कर्तव्य चुकत नाही.**

## पंचांग

**रविवार, २४ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**



**भाद्रपद शुक्ल प्रतिपदा**
**नक्षत्र : पूर्वा फाल्गुनी**

**रवी उदय- ०६-२३**
**रवी अस्त- १८-५९**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० सिंह**

**भाद्रपद मासारंभ; मौन व्रतारंभ; नूतन चंद्रदर्शन; श्रीगणेश नवरात्रारंभ**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

# खुसखुशीत साटोरी



★ **साहित्य -**
१/२ कप मैदा, २ चमचे रवा, १/२ कप तेल, १/२ कप साजूक तूप, १ कप पाणी, चिमूटभर वेलची पूड, १ कप पिठी साखर, १ कप किसलेले खोबरे.

★ **कृती-**
एका भांड्यात मैदा, रवा, जरासं आवड असल्यास मीठ घालून एकत्र करा. सर्व साहित्य चांगल्या प्रकारे मिसळा. आता भांड्यात थोडं-थोडं पाणी घाला आणि पीठ मळून घ्या. पिठाला सेट होण्यासाठी दोन ते तीन तास ठेवून द्यावे.
सारण तयार करण्याची कृती - एका भांड्यात बारीक किसलेले सुके खोबरे, पिठी साखर, चिमूटभर वेलची पूड मिसळा. सारणाचे लहान-लहान लाडू वळून घ्या. आता मळलेले पिठाला एकसारखे करून त्याचा लहान लहान गोळ्या बनवून पुरीचा आकार द्या. आता या पुरीमध्ये सारणाचे लाडू मोदकासारखे भरून पोळी प्रमाणे लाटून घ्या. या लाटलेल्या पोळीला एका पॅनमध्ये थोडसं तूप घालून शेकून घ्या. दोन्हीकडून चांगल्या प्रकारे तांबूस रंग येईपर्यंत शेका. साटोरी तयार. आपण आवडीप्रमाणे शेकल्यावर साटोऱ्या तुपात तळूदेखील शकतात. खुसखुशीत राहतात.



# फिफा विश्वचषकाची सोडत वॉशिंग्टनमध्ये संघटनेच्या प्रमुखांनी ट्रम्प यांची भेट घेतली

**जगातील सर्वात मोठ्या क्रीडा स्पर्धांपैकी एक असलेला फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेची सोडत आता लास वेगासमध्ये नाही, तर अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टनमधील प्रतिष्ठित केनेडी सेंटरमध्ये ५ डिसेंबर रोजी काढणार आहे आणि याची घोषणा स्वतः अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. ११ जून ते १९ जुलै २०२६ दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्याचे पहिले तिकीट इन्फँटिनो यांनी ट्रम्प यांना दिले. तिकिटीचा क्रमांक रो-१, सीट-१, तिकीट क्रमांक ४५/४७ आहे. ही फायनल न्यू जर्सी येथील मेटलाईफ स्टेडियमवर होईल.**



■ वॉशिंग्टन

**ओव्हल** ऑफिसमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात फिफा प्रमुख जियानी इन्फँटिनो यांनी अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांना भेटून त्यांना फिफा विश्वचषक ट्रॉफी दाखवली. ही ट्रॉफी पाहून ट्रम्प भारावून गेले. त्यावेळी इन्फँटिनो यांनी ट्रम्प यांना सांगितले की, फक्त फिफा अध्यक्ष, राष्ट्रप्रमुख आणि विजेतेच ट्रॉफीला स्पर्श करू शकतात. कारण ती फक्त विजेत्यांसाठी आहे. तुम्ही विजेते असल्याने अर्थातच तुम्ही ती स्पर्श करू शकता. यावर ट्रम्प गमतीने म्हणाले की, मी ती ठेवू शकतो का? हा सोन्याचा एक सुंदर तुकडा आहे. या भेटीचा फोटो त्याच्या इंस्टाग्रामवर शेअर करताना इन्फँटिनो यांनी लिहिले की, फिफा विश्वचषक २०२६ च्या सर्व १०४ सामन्यांची तिकिटे बुधवारी १० सप्टेंबर २०२५ पासून विक्रीसाठी उपलब्ध होतील. मला खूप आनंद आहे की, मी व्हाईट हाऊसमध्ये अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना पहिले तिकीट दिले. १९ जुलै २०२६ रोजी न्यू यॉर्क-न्यू जर्सी येथे होणाऱ्या या ऐतिहासिक फायनलमध्ये राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे स्वागत करण्यास आम्ही उत्सुक आहोत, जिथे लाखो चाहते सामने पाहण्यासाठी एकत्र येतील. फुटबॉलचा हा उत्सव अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोच्या सर्व यजमान शहरांमध्ये इतिहास घडवेल. या सोडतीचे जगभरात थेट प्रक्षेपित दाखवले जाईल आणि सुमारे एक अब्ज लोक तो पाहतील.

# आशिया क्रिकेट कपसाठी बांगलादेशचा संघ जाहीर

■ ढाका

**बांगलादेश** क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) आशिया क्रिकेट कपसाठी १६ खेळाडूंचा संघ जाहीर केला. अष्टपैलू मेहदी हसन मिराजला स्थान मिळाले नाही. यष्टीरक्षक फलंदाज नुरुल हसन आणि फलंदाज सैफ हसन यांना संधी मिळाली. लिटन दास टी-२० स्पर्धेत संघाचे नेतृत्व करेल. त्याने पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्धची शेवटची मालिका जिंकली होती. दोन्ही संघ आशिया कपमध्येही सहभागी होतील.

पुरुषांचा टी-२० आशिया कप ९ सप्टेंबरपासून संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथे खेळला जाईल. बांगलादेशचा पहिला सामना ११ सप्टेंबर रोजी हाँगकाँगविरुद्ध होईल. संघाच्या गटात श्रीलंका आणि अफगाणिस्तानचाही समावेश आहे. टीम इंडिया ग्रुप ए मध्ये आहे. ३१ वर्षीय नुरुल हसनने बांगलादेशसाठी शेवटचा टी-२० सामना ३ वर्षांपूर्वी खेळला होता. सैफ हसनने २०२३ च्या आशियाई स्पर्धेत बांगलादेशसाठी शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. दोन्ही खेळाडूंना देशांतर्गत क्रिकेटमधील चांगल्या कामगिरीचा फायदा झाला.

# रोहित आणि विराटच्या निवृत्तीबद्दल बोलणे घाईचे! राजीव शुक्लांचे वक्तव्य

■ नवी दिल्ली



**भारतीय** एकदिवसीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या निवृत्तीबाबत बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी एक वक्तव्य केले. ते म्हणाले की, विराट कोहली आणि रोहित शर्मा पूर्णपणे तंदुरुस्त आहेत. ते अजूनही एकदिवसीय क्रिकेट खेळत आहेत आणि चांगले प्रदर्शन करत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या निवृत्तीबद्दल बोलणे घाईचे होईल. राजीव शुक्ला यांनी सांगितले की, रोहित शर्मा आणि विराट कोहली दोघेही एकदिवसीय सामने खेळत आहेत. ते निवृत्त झालेले नाहीत, मग तुम्ही त्यांच्या निरोपाबद्दल का बोलत आहात आणि काळजी का करत आहात? बीसीसीआयचे धोरण अगदी स्पष्ट आहे, आम्ही कोणालाही निवृत्त होण्यास सांगणार नाही, त्यांना स्वतःचा निर्णय घ्यावा लागेल. जेव्हा त्यांचा निरोप सामना आयोजित करण्याची वेळ येईल, तेव्हा आम्ही पाहू.

# कर्णधार शुभमन गिल आजारी! दुलीप ट्रॉफीतून बाहेर पडणार

■ बंगळुरू

**बंगळुरूमध्ये** २८ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या दुलीप ट्रॉफीमधून नॉर्थ झोनचा कर्णधार शुभमन गिल बाहेर पडणार आहे. तो आजारी असून त्याची नुकतीच रक्त तपासणी झाली. त्यानंतर फिजिओ आणि वैद्यकीय पथकाने त्याचा अहवाल बीसीसीआयला पाठवला आणि तो दुलीप ट्रॉफीमध्ये सहभागी होऊ शकणार नाही, असा सल्ला दिला.

सध्या गिल चंदीगडमध्ये आहे आणि घरी विश्रांती घेत आहे. गिलची आशिया कपमध्ये भारतीय संघाचा उपकर्णधार म्हणून निवड झाली आहे. अशा परिस्थितीत बोर्ड कोणताही धोका पत्करू इच्छित नाही. संघ ४ किंवा ५ सप्टेंबर रोजी दुबईला रवाना होईल. तसेही गिलला संपूर्ण दुलीप ट्रॉफी खेळता आली नसती. कारण त्याला ९ सप्टेंबरपासून आशिया कपसाठी राष्ट्रीय संघात सामील व्हायचे होते. दुलीप ट्रॉफी २८ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर दरम्यान चालेल.



अशा परिस्थितीत तो जास्तीत जास्त एक सामना खेळू शकला असता. गिल उत्तम फॉर्ममध्ये आहे. भारतीय कसोटी कर्णधार शुभमन गिल उत्तम फॉर्ममध्ये आहे. इंग्लंडविरुद्धच्या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत त्याने ४ शतकांसह ७५४ धावा केल्या. गिल गेल्या वर्षी दुलीप ट्रॉफीमध्येही खेळला होता आणि पहिल्या सामन्यात त्याने भारत 'अ' संघाचे नेतृत्व केले होते. तथापि, त्याच्या नेतृत्वाखाली भारत 'अ' संघाला अभिमन्यू ईश्वरनच्या नेतृत्वाखालील भारत 'ब' संघाविरुद्ध ७६ धावांनी पराभव पत्करावा लागला. रणजी ट्रॉफीच्या गेल्या हंगामात गिलने पंजाबचे नेतृत्व केले होते.

# आशियाई नेमबाजी स्पर्धेत अर्जुन-इलावेनिलला सुवर्ण

■ शिमकेंट

**१६ व्या** आशियाई नेमबाजी स्पर्धेतील १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक प्रकाराच्या अंतिम फेरीत भारताच्या अर्जुन बाबुता आणि इलावेनिल व्हॅलारिवन यांनी चीनच्या डिंगके लू आणि झिनलू पेंग यांचा १७-११ असा पराभव करत सुवर्णपदक पटकावले. अंतिम फेरीत सुरुवातीला डिंगके लू आणि झिनलू पेंगची जोडी पुढे होती. र्जुन बाबुता आणि इलावेनिल व्हॅलारिवनने ९.५ आणि १०.१ गुण मिळवून शानदार पुनरागमन केले



आणि सुवर्णपदक जिंकले. या स्पर्धेत एलावेनिलचे हे दुसरे पदक आहे. तिने यापूर्वी महिला गटात १० मीटर एअर रायफलमध्ये सुवर्णपदक जिंकले. यापूर्वी अर्जुन, रुद्राक्ष पाटील आणि किरण जाधव या भारतीय त्रिकुटाने पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत सांघिक सुवर्णपदक जिंकले होते.

# पीयूष चावलासह १३ भारतीयांची द. आफ्रिका टी-२० लीगमध्ये नोंदणी

■ जोहान्सबर्ग

**दक्षिण** आफ्रिकेच्या टी-२० लीगच्या चौथ्या हंगामासाठी १३ भारतीय खेळाडूंनी नोंदणी केली. यामध्ये पीयूष चावला, सिद्धार्थ कौल आणि अंकित राजपूतसारखी खेळाडूंची नावे आहेत. ९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या लिलावात ७८४ नोंदणीकृत क्रिकेटपटूंच्या यादीत हे खेळाडू आहेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या नियमांनुसार केवळ तेच भारतीय खेळाडू परदेशी लीगमध्ये भाग घेऊ शकतात. ज्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली किंवा आयपीएल-भारतासाठी खेळण्याचा आपला दावा सोडून दिला आहे. पीयूष चावला आणि इम्रान खान वगळता सर्व भारतीय खेळाडूंची मूळ किंमत २००,००० रँड म्हणजे सुमारे १० लाख रुपये आहे. पीयूष चावलाची राखीव किंमत १०,००,००० रँड म्हणजे ५० लाख रुपये आहे. इम्रान खानची मूळ किंमत ५,००,००० रँड म्हणजे २५ लाख रुपये आहे. पीयूष चावलाने त्याचा शेवटचा आयपीएल हंगाम मुंबई इंडियन्सकडून खेळला. हा लिलाव जोहान्सबर्ग येथे होईल. लीगमधील ६ फ्रँचायझींकडे एकूण ७.४ दशलक्ष अमेरिकन डॉलरची रक्कम आहे. या पैशातून त्यांना ८४ जागा भराव्या लागतील.

# डी गुकेश पराभवातून थोडक्यात बचावला

■ सेंट लुई

**सिंकफिल्ड** कप बुद्धिबळ स्पर्धेत विश्वविजेता भारतीय ग्रँडमास्टर डी गुकेश पोलंडच्या दुडा जान क्रिझटोफ विरुद्ध पराभवातून थोडक्यात बचावला आणि त्याला गुणांची विभागणी करावी लागली. त्याचवेळी, आणखी एक भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंदानेही पाचव्या फेरीत फ्रान्सच्या मॅक्सिम वाचियर-लाग्रावेसोबत बरोबरी साधली. विशेष म्हणजे, पाचव्या फेरीतील सर्व सामने बरोबरीत सुटले. अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाने ३.५ गुणांसह एकमेव आघाडी घेतली. त्याने वेस्ली सो याच्याशी बरोबरी साधली. इतर सामन्यांमध्ये अमेरिकेच्या सॅम्युअल सेव्हियनने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह याच्याशी बरोबरी साधली तर फ्रान्सच्या लेव्हॉन आरोनियन आणि अलिरेझा फिरोजा यांच्यातील सामनाही बरोबरीत सुटला.

# विश्व युवा तिरंदाजी स्पर्धेत भारतीय महिला संघाला कांस्य

■ विनीपेग (कॅनडा)

**विनीपेग** येथे सुरू असलेल्या १८ वर्षांखालील वयोगटाच्या विश्व युवा तिरंदाजी स्पर्धेत भारताच्या महिला रिकर्व्ह संघाने कांस्यपदक पटकाविले. या स्पर्धेत महिलांच्या १८ वर्षांखालील वयोगटातील झालेल्या कांस्यपदकासाठी लढतीच्या सांघिक महिलांच्या रिकर्व्ह प्रकारात भारताच्या गाथा आनंदराव खडके, जिआना कुमार, शर्वरी सोमनाथ शेंडे यांनी अमेरिका संघाचा ६-० असा एकतर्फी पराभव करत कांस्यपदक मिळविले.

चौथ्या मानांकीत भारतीय महिला रिकर्व्ह संघाला पहिल्या फेरीत पुढे चाल मिळाली होती. त्यानंतर दुसऱ्या फेरीत भारताने मेक्सिकोचे आव्हान ६-० असे संपुष्टात आणत उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळविले. उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत भारताने जपानवर ५-३ अशी मात करत उपांत्य फेरी गाठली. मात्र उपांत्य लढतीत प्रजासत्ताक कोरियाने भारतावर ६-२ अशी मात करत अंतिम फेरीत स्थान मिळविले. या स्पर्धेत भारतीय पुरुष रिकर्व्ह संघाला कांस्यपदकाच्या सामन्यात तुर्कीने ३-५ असे पराभूत केले.

**चातुर्मासातील दुसरा महत्त्वाचा महिना म्हणजे भाद्रपद. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला पार्थिव गणपती पूजन करण्याची प्राचीन परंपरा आपल्याकडे आहे. बुधवार, २७ ऑगस्ट २०२५ रोजी संपूर्ण देशभरात गणेश पूजा केली जाईल. गणपतीबाप्पा हे अग्निदेवता, विघ्नेची देवता असे म्हटले जाते. प्रत्येक शुभ कार्यात पहिला मान गणपती बाप्पाचा असतो. या गणपती बाप्पाचा भाद्रपद उत्सव संपुर्ण महाराष्ट्र व भारत देशासह संपुर्ण जगभरात साजरा केला जातो. अनेक मंडळे हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात. तसेच प्रत्येक घरोघरी देखील गणेश उत्सव साजरा केला जातो. हल्ली गणपतीची स्थापना करण्यासाठी ब्राह्मण मिळणे शक्य नसते अशा यावेळी आपण घरच्या घरीच बाप्पाची स्थापना करू शकतो. ते कशाप्रमाणे ते पुढे पाहूया...**

# घरच्या घरी गणेशाची स्थापना करा...



घरामध्ये जिथे आपण गणपती बसवणार आहोत तिथे पहिले डेकोरेशन करून घ्यायचे आहे. गणपती बसवताना आपण पुर्वेला किंवा उत्तरेला बसवावा किंवा ईशान्य कोपऱ्यात असावा तिथे आपण पाटावर लाल वस्त्र घालून त्यावर अक्षदा टाकाव्यात मंडप सजवुन ठेवायचा आहे. आपले लायटिंग करून पुर्ण डेकोरेशन करून झाल्यावर मगच गणपती आणायचा.

पूजेसाठी लागणारे साहित्य- कापुर, श्रीफळ, फुले, हार, दुर्वा, अगरबत्ती, धुप, अत्तर, जान्हवे, कापसाचे वस्त्र, पाच विड्याची पाने, सुपारी २ , खव्याचे मोदक किंवा आपण घरी करतो ते मोदक. वस्त्र, ५ फळे, चंदन, हळद, कुंकू, शेंदुर, गुलाल, बुका, गरम पाणी, अक्षदा, पंचामृत आणि पाच झाडांच्या पत्री, तांब्या, ताम्हण, पळी, समई, निरंजन, आरतीचे ताट, तुपाचे निरंजन दोन देवासाठी चौरंग किंवा पाट इ.

पूजेची सुरुवात- सर्वात प्रथम जो व्यक्ती पूजा करणार आहे त्यांनी स्वच्छ वस्त्र किंवा सोवळे घालायचे आहे. प्रथम स्वतःच्या कपाळावर कुंकू लावावे. समई लावा. एका पेल्यात स्वच्छ पाणी घ्यावे. ते पाणी पळीत घेऊन प्रथम आचमन करा. ॐ केशवाय नमः, ॐ नारायणय नमः, ॐ माधवाय नमः असे म्हणत प्रत्येक नाव म्हटल्यानंतर भांडयातील पळीभर पाणी हातात घेऊन आवाज न करता प्यावे.

चौथ्यांदा ॐ गोविंदाय नमः म्हणत पळीने हातात पाणी घेऊन ताम्हणात सोडा. आता परत आणखी एकदा वरील प्रमाणेच आचमन करावे. त्यानंतर हातात अक्षदा घेऊन दोन्ही हात जोडून गणपती पुजनाचा संकल्प करा-

श्री मन्महागणाधिपते नमः। श्री गुरुभ्यो नमः। सरस्वतै नमः। वेदाय नमः। वेदपुरूषाय नमः। इश्वरदेवभ्येनमः। कुलदेवताभ्या नमः । स्थानदेवाताभ्या नमः। वास्तुदेवताभ्या नमः। आणि हातातील अक्षता उजव्या हातावर घेऊन त्यावर पाणी घालून अक्षतासह पाणी ताम्हणात सोडावे. त्यानंतर वक्रतुंड महाकाय सुर्यकोटी समप्रभ। निर्विघ्नं कुरूं मे दैव सर्व कार्येषु सर्वेदा।। हा मंत्र म्हणावा.

आता कलशपुजा करावी. कलश म्हणजे पुजेसाठी घेतलेल्या तांब्याला गंध लावुन त्यावर अक्षता आणि फुले वाहावीत. कलश पूजन झाल्यानंतर घंटेची पूजा करावी. पुजेतील घंटेला गंध लावून त्यावर अक्षता आणि फुल वाहावीत यानंतर पूजा केलेल्या तांब्यातील पाणी फुलाने घेऊन ते सर्व पुजेच्या साहित्यावर आणि आपल्यावर शिंपडुन घ्यावे आणि आपण घरातील सर्वांनी श्री गणपतीचे पुजन करा हात जोडून श्रीगणपतीचे ध्यान करा.

एकदंत शुर्पकर्ण गजवक्रं चतुर्भुजम्।
पायांकुशधरं देवं घ्यायेत सिध्दिविनायकम।।
श्री महागणपतये नमः ध्यायामी

वरील पंक्ती म्हणून झाल्यानंतर मुर्तिच्या छातीला हात लावून नंतर मुर्तीवर अक्षदा वाहाव्यात आणि हात जोडा. श्री महागणपतये नमः अवाहयामी पूजा करताना सर्वांनी शांत राहून पाया पडायचे आहे. शांती भव, सुप्रसन्न भवो, अभिमुखो भव, सुप्रतिष्ठितो भव नंतर श्री गणपतीच्या उजव्या बाजुला आसनावर अक्षदा वाहा व पळीमध्ये तांब्यातील पाणी घेऊन त्यात गंध, अक्षता, घालून ते फुलाने किंवा दुर्वानी श्रीगणपतीवर शिंपडावे.

आता श्रीगणपतीला पंचामृत स्नान घालायचे आहे. आपण दुध,दही, तुप, मध आणि साखर घालुन पंचामृत तयार केलेले असेल ते थोडे पळीमध्ये घ्या व मूर्तीवर शिंपडा नंतर परत पळीमध्ये गंध आणि पाणी घेऊन ते फुलाने किंवा दुर्वांनी श्रीगणपतीवर शिंपडावे. त्यानंतर पळीमध्ये शुध्द पाणी घेऊन ते फुलाने किंवा दुर्वानी श्रीगणपतीवर शिंपडावे आता श्रीगणपतीला कापसाचे वस्त्र घालावे. गणपतीच्या उजव्या हातातून जान्हवे घालून ते डोक्यावरून घालावे आता श्रीगणपतीला प्रथम गंध किंवा चंदन लावावे नंतर हळदी कुंकू लावावे. नंतर मूर्तीला सुगंधित अत्तर लावावे आता श्रीगणपतीला दुर्वा वाहायच्या आणि गणपतीला अलंकार म्हणून अक्षदा घातल्यावर गणपतीला नाना प्रकारची फुले आणि पत्री वाहावीत. त्यानंतर गणपतीला धुप किंवा सुवासिक उदबत्त्यांनी ओवाळून नंतर तुपाच्या दिव्याने ओवाळावे आणि नैवेद्य दाखववावा. श्री गणपतीला गुळ खोबऱ्याचा, मोदकांचा अथवा लाडु, पेठे इ. गोड पदार्थांचा नैवेद्य दाखववावा. हातात २ तुळशीपत्र आणि पाणी घेऊन नैवेद्यच्या भोवती २ वेळा गोल फिरवावे यानंतर ४ वेळा ताम्हणात पाणी सोडतांना उरलेले ३ तुळशीपत्र ताम्हणात पाण्याबरोबर सोडून द्यावे.

गणपती बाप्पाला चंदन लावा आणि २ विडयांची पाने घेऊन त्यावर १ सुपारी, १ नाणे व १ फुल ठेवुन तो विडा आणि ३ नारळ घेऊन श्रीगणपतीच्या उजव्या बाजुला ठेवा आणि त्या विडयावर आणि नारळावर उजव्या हाताने पाणी सोडा. गणपतीला तुपाच्या दिव्याने ओवाळावे आता कापुर लावावा आणि आपल्या उजव्या बाजुला वळून स्वतःभोवती एक प्रदक्षिणा घाला. देवासमोर एक साष्टांग नमस्कार घाला. आता फुलांना गंध लावुन घेऊन ती देवाच्या पायावर वाहावीत. शेवटी तुळशीपत्र आणि अक्षता वाहा आता देवासमोर हात जोडून नमस्कार करा. आणि देवासमोर हात जोडून उभे राहा.

आवाहन नजानामि न जानामि तवार्चनम।
पुजां चैव नजानामि क्षक्यता परमेश्वर।।
मत्रहिनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर।
यत्पुजित मया देव परिपुर्ण तदस्तु मे।।
अन्यथा शरण नास्ति त्वमेव शरमं मम।
तस्मात्कारूव्यभावेन रक्ष रक्ष परमेश्वर।।

आपण पळीमध्ये पाणी घेउन हातातुन ताम्हणात सोडावे आणि हात जोडुन गणपतीला नमस्कार करावा.

ॐ केशवाय नमः ॐ नारायणाय नमः ॐ माधवाय नमः

ॐ गोविंदाय नमः हात जोडुन गणपतीला नमस्कार करावा. अशा पध्दतीने गणपतीची स्थापना करावी. वरील सर्व विधी पुर्ण झाल्यावर गणपतीची आरती करायची आहे आणि गणपती स्थापना पुर्ण होईल.

# सुख शांती समाधान

## हरितालिकेचे व्रत

**हरितालिका हे हिंदू धर्मातील महिलांसाठी आणि कुमारिकांसाठी सांगितलेले एक धार्मिक व्रत आहे. 'हरिता' म्हणजे 'जिला नेले ती' व'लिका' म्हणजे 'सखी'. पार्वतीला शिवप्राप्तीसाठी सखी तपश्चर्येला घेऊन गेली म्हणून पार्वतीला 'हरितालिका' असे म्हणतात. हरितालिका कथा ही भविष्य पुराणातील हरगौरीसंवादात आली आहे.गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी भाद्रपद शुद्ध तृतियेला हरितालिकेची पूजा करतात .**

या दिवशी, महिला उपवास करून भगवान शंकर आणि माता पार्वतीची पूजा करतात. हरितालिका व्रतात, स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात.

हरितालिकाचे व्रत करणाऱ्या मुली व महिलांनी सकाळी लवकर उठून पाण्यात गंगाजल मिसळून स्नान करावे. स्नान करताना सर्व तीर्थक्षेत्रे आणि पवित्र नद्यांचेही ध्यान करावे. पाण्यात थोडेसे गोमूत्र मिसळले तर ते शुभ होईल. स्नान केल्यानंतर स्वच्छ केलेल्या जागेवर एका जागी चौरंग ठेवावा. रांगोळी काढून व केळीच्या खांबांनी चारही बाजूंनी सुशोभित केलेल्या चौरंगावर वाळू आणून पार्वती आणि सखीसह शिवलिंग स्थापित करावे. उजव्या बाजूस तांदळाच्या एका ढिगावरील सुपारीवर किंवा नारळावर गणपती मांडावा. समोर पाच विडे मांडून तेथे सुपारी, खारीक, बदाम, नाणे, फळ ठेवावे.

आंघोळीनंतर सूर्याला जल अर्पण करावे व घरगुती मंदिरात गणेशाची पूजा केल्यानंतर शिव-पार्वतीची पूजा करावी. पूजेमध्ये परमेश्वराला दूध, दही, तूप, पाण्याचा अभिषेक करावा. बिल्वाची पाने, हार, फुले आणि गुलाब अर्पण करा. देवतेला वस्त्र, हार आणि फुलांनी सजवा. मिठाई अर्पण करा. धूप आणि दिवे लावा. शिव-पार्वतीसमोर हरितालिका व्रत करण्याचा संकल्प घ्यावा.

हे व्रत करणाऱ्या महिलांनी दिवसभर पाणीही पिऊ नये. ज्या महिलांना उपाशी राहणे आणि तहानलेले राहणे शक्य नसेल त्यांनी फळे आणि दूध यांचे सेवन करू शकतात. आजारी आणि गरोदर महिलांनी उपवास टाळावा, त्यांनी विधीप्रमाणे पूजा करावी.हरितालिकाच्या दिवशी सकाळ-संध्याकाळ पूजा करावी आणि दिवसभर शिव-पार्वतीचे ध्यान करत मंत्राचा जप करावा. देवाची कथा वाचावी आणि ऐकावी. शिवपुराण कथा ऐकावी.

पूजेच्या वेळी पार्वतीला लाल बांगड्या, लाल वस्त्र, कुंकुम, लाल फुले, अत्तर, सिंदूर, हळद अर्पण करा व पूजेनंतर या वस्तू एखाद्या गरजू विवाहित स्त्रीला दान कराव्यात.



श्रद्धेनुसार, या दिवशी उपवास करणाऱ्या महिलांनी घरच्या पूजेच्या ठिकाणी दिवसभर दिवा लावावा. हा दिवा किमान २४ तास जळत ठेवला पाहिजे. व्रत करणाऱ्या स्त्रियांनी पारणाच्या वेळी उपवास मोडला पाहिजे. या दिवशी महिलांनी चुकूनही काळे कपडे घालू नयेत. पूजेमध्ये काळे कपडे घालणे चांगले मानले जात नाही. हे व्रत पाळल्यास महिलांच्या जीवनसाथींना दीर्घायुष्य, सौभाग्य आणि उत्तम आरोग्य मिळू शकते.ज्या मुली अविवाहित आहेत त्या सुध्दा योग्य आणि इष्ट पती मिळण्याच्या इच्छेने हे व्रत करू शकतात.

बायकोच्या सुखी आयुष्यासाठी आणि सौभाग्यासाठी महिलांसोबतच पतीही हे व्रत करू शकतात. हरितालिका व्रत सर्व विवाहित महिलांसाठी खूप खास आहे. भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या तृतीयेला साजरे होणारे हे व्रत प्रत्येक विवाहित स्त्री पतीच्या दीर्घायुष्यासाठी व त्यांच्या वैवाहिक जीवनात आनंदाची कामना करते. या दिवशी देवी पार्वती आणि शिव यांची पूजा केल्याने अखंड सौभाग्याचे आशीर्वाद प्राप्त होतात.

**टीप-** या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

# अटल सेतू सागरी पुलावर इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफ

■ मुंबई

**खासगी** तसेच सरकारी इलेक्ट्रिक चारचाकी वाहनांना अटल सेतूवर गुरुवार २१ ऑगस्टपासून टोल माफी करण्यात आली असून आज शुक्रवारपासून ती लागू करण्यात आली आहे.

एप्रिल महिन्यातच या टोल माफीसंदर्भात घोषणा करण्यात आली होती. तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी आजपासून करण्यात आली आहे. राज्यातील मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व समृद्धी महामार्ग या दोन महामार्गावरही येत्या दोन दिवसांत हा नियम लागू होण्याचे संकेत आहेत. वाहतूक क्षेत्रातून होणारे कार्बन, प्रदूषणकारी वायू आणि हरित गृह वायू उत्सर्जन रोखण्यासाठी एप्रिल महिन्यात महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण जाहीर करण्यात आले आहे.



# नितेश राणेंचा जुगार अड्ड्यावर छापा! पोलीस निरीक्षक निलंबित

■ सिंधुदुर्ग

**सिंधुदुर्ग** जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी कणकवली शहरातील एका मटका अड्ड्यावर गुरुवारी छापा टाकला होता. या प्रकरणी १२ जणांवर कारवाई करण्यात आली होती. या प्रकरणाचा वरिष्ठ कार्यालयाकडे अहवाल पाठवला होता. त्यानंतर कणकवली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल जाधव यांना जिल्हा पोलीस अधीक्षक मोहन दहीकर यांनी तडकाफडकी निलंबित करण्यात केले . नितेश यांनी छापा टाकलेले ठिकाण पोलीस स्थानकापासून ५०० मीटरच्या अंतरावर आहे. या मटका अड्ड्यावर कारवाई करण्याचे आदेश नितेश राणे यांनी वारंवार दिले होते. परंतु कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे नितेश यांनी स्वतःच ही धाड टाकली. या अड्ड्यावर कारवाई न केल्यामुळे अतुल जाधव यांना निलंबित करण्यात आले असून काही पोलीस कर्मचाऱ्यांची खात्याअंतर्गत चौकशी सुरू आहे. या कारवाईमुळे पोलीस खात्यात खळबळ उडाली आहे.



**लालबागच्या बाजारात गणेशोत्सवानिमित्त भव्य लाडू आणि मोदक खरेदीसाठी उपलब्ध झालेले आहेत.**

# पंढरपुरात पूरजन्य परिस्थिती प्रशासनाकडून सर्व घाट बंद

■ सोलापूर

**सोलापुरातील** उजनी आणि वीर धरणातून सोडलेले १ लाख ३५ हजार क्युसेक पाणी भीमा नदी पात्रात आले. यामुळे पंढरपुरात कालपासून पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. काल रात्री नदी पात्रातले पाणी वाढल्याने ४५० कुटुंबांना स्थलांतरित करण्यात आले. हे पाणी सर्व घाटांपर्यंत पोहोचल्याने प्रशासनाने बॅरीगेटिंग करून सर्व घाट भाविकांसाठी बंद केले आहेत. दरम्यान, गोपाळपुल देखील पाण्याखाली गेला आहे, तसेच चंद्रभागेतील ब्रिटिशकालीन पुलदेखील पाण्यात बुडाला आहे. खबरदारी म्हणून प्रशासनाने चंद्रभागा नदीपात्रात बोट तैनात केली आहे. या बोटीच्या माध्यमातून भाविकांना नदी पात्रात स्नानासाठी उतरू नये, असे आवाहन करण्यात येत आहे.

# बेरोजगारीच्या प्रश्नावर काँग्रेस २५ ऑगस्टला रोजगार सत्याग्रह व तिरंगा यात्रा काढणार

■ मुंबई

**राज्य** सरकारच्या विविध विभागात तब्बल २.५ लाख रिक्त पदे असूनही नोकर भरती केली जात नाही. लाखो तरुणांच्या भविष्याशी सरकार खेळ खेळत आहे. रिक्त जागा असतानाही सरकार कंत्राटी पद्धतीने भरती करत आहे. काँग्रेस पक्ष या बेरोजगारी विरोधात आवाज उठवत असून छत्रपती संभाजीनगर येथे सोमवारी २५ ऑगस्ट रोजी रोजगार सत्याग्रह व तिरंगा यात्रा काढण्यात येणार आहे. प्रदेश काँग्रेसच्या रोजगार विभागाचे संयोजक व प्रदेश सरचिटणीस धनंजय रामकृष्ण शिंदे यांनी यासंदर्भात म्हटले आहे की, राज्य विद्युत महामंडळाच्या महावितरण, महापारेषण व इतर विभागांमध्ये शेकडो जागा रिक्त आहेत. मात्र सत्ताधाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे ही पदे भरली जात नाहीत. रोजगार सत्याग्रह यात्रेतून आम्ही सरकारला कठोर इशारा देत आहोत, भरती प्रक्रिया सुरू करा अन्यथा काँग्रेस रस्त्यावर तसेच विधानसभेतही याविरोधात आवाज उठवेल. तरुणांचे रोजगार हक्क अबाधित राखण्यासाठी रोजगार सत्याग्रह व तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली आहे. सकाळी ९:०० वाजता क्रांती चौक येथून या यात्रेला प्रारंभ होऊन एमएसईबीचे सह-व्यवस्थापकीय संचालक कार्यालय, मिल कॉर्नर येथे पोहोचेल. तेथे निवेदन सादर केल्यानंतर दुपारी विभागीय आयुक्त कार्यालयात निवेदन सादर करणार आहे.

# संभाजीनगरात प्लॉटवरील खडीवरून वाद! तरुणाची हत्या

■ संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगरमध्ये एकाच गल्लीमध्ये राहणाऱ्या दोन कुटुंबांमध्ये प्लॉटवर असलेल्या खडीवरून वाद झाला. यात एका कुटुंबातील ६ जणांनी शेजारी राहणाऱ्या कुटुंबावर धारदार शस्त्राने हल्ला करून ३ जणांना गंभीर जखमी केले तर एका तरुणाची हत्या केली. ही घटना एन-६ मधील संभाजी कॉलनीमध्ये काल दुपारच्या सुमारास घडली. प्रमोद रमेश पाडसवान (३८) असे मृत तरुणाचे नाव आहे. तर त्यांचे वडील रमेश जगन्नाथ पाडसवान (६०) आणि प्रमोद यांचा मुलगा रुद्राक्ष पाडसवान (१७) गंभीर जखमी झाले. आई मंदाबाई यांनाही मारहाण केली झाल्याने त्यांनाही दुखापत झाली आहे. या प्रकरणी ज्ञानेश्वर काशिनाथ निमोने, गौरव काशिनाथ निमोने, सौरव काशिनाथ निमोने, काशिनाथ येडू निमोने, शशिकला काशिनाथ निमोने व जावई मनोज दानवे यांच्यासह अन्य आरोपींवर सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलीस निरीक्षक कुंदन वाघमारे यांनी सांगितले. यातील ज्ञानेश्वर, काशिनाथ, मनोज, सौरव, गौरव यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून अन्य आरोपींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# एसटीच्या सीएनजी गाड्यांमुळे मुरबाड प्रवाशांची रखडपट्टी

■ मुरबाड

**मुरबाड** आगारातून कल्याणला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या सर्वात जास्त आहे. यां मार्गावर एसटीच्या मुरबाड आगारातून सीएनजी बसेस वापरल्या जात आहेत. मुरबाड व कल्याण आगारात सीएनजी पंप नसल्याने या बस गाड्या मुरबाड कल्याण फेरी मारताना भिवंडी येथे सीएन जी भरण्यासाठी जातात. त्यामुळे मुरबाड कल्याण या परतीच्या एका फेरीला पाच ते सहा तास लागतात, कल्याण येथून मुरबाड जाणाऱ्या प्रवाशांना या सीएनजी भरण्यासाठी गेलेल्या बसची कल्याण बस स्थानकात वाट पाहत ताटकळत उभे रहावे लागते. शुक्रवार ,शनिवार व रविवार या सुट्ट्यांच्या दिवशी तर तासनतास बसची वाट पाहावी लागते.



# सर्जियो गोर यांची नियुक्ती भारतात अमेरिकेचे राजदूत

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातील राजदूत म्हणून त्यांचे जवळचे अधिकारी ३९ वर्षांचे सर्जियो गोर यांची नियुक्ती केली आहे. ट्रम्प यांनी म्हटले आहे की, माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास असून ते अमेरिकेला पुन्हा एकदा महान राष्ट्र करण्याच्या प्रयत्नात आपले पूर्ण योगदान देतील.

सर्जियो गोर यांचा जन्म ताश्कंदमधील आहे. ते अमेरिकेचे सर्वात तरुण राजदूत आहे. ते या आधीचे राजदूत एरिक गारसेटी यांची जागा घेणार आहे. भारतातील राजदूत हे अमेरिकेसाठी महत्त्वाचे असून त्यांच्याकडे दक्षिण अशियातील इतर देशांचाही कारभार सोपवला जात असतो. पाकिस्तान, बांगलादेश व इतर लहान देशांमध्ये जिथे अमेरिकेचे राजदूत नाहीत तेथील दूतावास हे भारतातील राजदूतांच्या अखत्यारीत येत असतात.


# पिंपरीत उद्यानांमध्ये खेळांची साधने लावण्यास मनाई

■ पिंपरी

**अनेकदा** काही सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये मनोरंजनाच्या खेळांची साधने तुटून अपघात घडल्याचे निदर्शनास आले. अशा अपघातातून जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा विचार करून पिंपरी-चिंचवड महापालिकेने

मोकळ्या जागा आणि पालिकेची उद्याने याठिकाणी मनोरंजनाच्या खेळांची साधने लावण्यास मनाई केली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेची मैदाने, उद्याने, मोकळ्या आणि आरक्षित जागांमध्ये झुले,गोलचक्रे, ट्रॅम्पोलिन,फुग्यांची घरे, विविध राईड्स अशा विविध प्रकारच्या मनोरंजनांची आणि खेळांची साधने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित विभाग व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले आहेत.नागरिक, संस्थांमार्फत विविध उत्सव, प्रदर्शनांसाठी महापालिकेच्या मोकळ्या, आरक्षित जागा, मैदाने, उद्याने भाड्याने घेण्यात येतात. या ठिकाणी नागरिक, लहान मुले जास्तीत जास्त संख्येने यावीत, यासाठी तेथे झुले, गोलचक्रे, ट्रॅम्पोलिन, फुग्यांची घरे, विविध राईड्स अशा प्रकारची मनोरंजनांची व खेळांची साधने लावली जातात. सध्या अशा प्रकारे खेळांची साधने लावणे, वीज, शोभेची रोषणाई करण्याचे प्रमाण वाढले आहे. काही ठिकाणी कार्यक्रमाबरोबर विविध यांत्रिक मनोरंजन खेळांची साधने लावली जातात.

# नवाकाळ शब्दकोडे-१३५२



**आडवे शब्द –**

२. फाल्गुनामधला एक सण ४. सडेतोड प्रतिक्रिया ७. उपरा, नाक खुपसणारा ११. हातापायांची आगआग होणारा विकार, विपादिका १२. सदन १३. म्हैस १५. अंगरख्याचा प्रकार, कुडता १६. प्रसन्न चेहऱ्याचा १७. गवताची काडी १९. जीव भांड्यात पडणे, धीर येणे २१. तोंड २३. साडी किंवा कुर्त्याचे उंची व मऊ वस्त्र २५. प्रत्येक २७. निरुपयोगी सामानाचा पसारा २८. रगेल २९. भक्षण ३०. अत्यंत स्वार्थी ३३. अत्यल्प, सूक्ष्म ३४. चार चाकी वाहन ३५. तेलबिया गाळण्याचे साधन ३६. कथित जादूटोण्याचा प्रकार ३७. कोरडा ३८. देवी ३९. आदला दिवस ४०. मोठी बहीण ४२. प्रतिज्ञा ४४. दागदागिने ४७. तांबूल ४८. शत्रूराष्ट्रात केल्या जाणाऱ्या गुप्त कारवाया ५०. नवरा ५२. उंदराचे घर ५३. जिनसांची यादी ५५. महत्त्वाची चीज, संग्रह, भांडार ५६. कासोटा ५८. मुंडण ५९. आंघोळ न केलेला ६०. नथीतला चिमटा, धनुष्य ६३. एकांतात राहायला जाणे ६५. प्रिय व्यक्ती दूर असणे ६६. भारावलेला, हुरळलेला ६७. आय ६८. सदस्य ७०. रखवाली करणारा ७२. तृण, चारा ७३. कष्ट ७४. सर्व ७५. नऊवारीबरोबरचे वस्त्र ७७. जंगल ७८. वडील ८२. संकटात पाठीशी असणारा, पाठराखण करणारा ८४. कमळांचे तळे ८७. भ्रमरी; लक्ष्मीचे एक नाव ८८. पादत्राणे नसलेला ८९. बाहेरचा, उपरा ९१. अरण्य ९२. कुशल, वाकबगार ९३. राहुचे रत्न ९४. गुरांना बांधायचा दोर ९६. दमट ठिकाणी येणारा किळसवाणा कीटक, बागुरडा ९७. भगवे वस्त्र ९८. गुरांचे अन्न ९९. निर्धन

**उभे शब्द –**

१. मोकळा स्वभाव २. शंकराचे मंदिर ३. अभिप्राय ४. पुनरागमन ५. घशाला सुटलेली खाज ६. पाऊल, टांग, किनारा ८. प्रदेश, टापू ९. दोरखंड १०. अडथळा आणणे, नाट लावणे १२. सलगी १४. कालव्याचे किंवा पाटाचे पाणी आत घेऊन बांधलेला हौद किंवा कृत्रिम विहीर १६. श्वासोच्छ्वासासाठी आवश्यक १८. नांगरणीसाठी प्राणी १९. फुलांची माला २०. सैन्याचा प्रमुख २२. विश्वासघातकी, गद्दार २३. आश्रम २४. कमळाच्या बियांचा पदार्थ २५. दुर्दैवी २६. ताकीद, समज २८. तंतू, वायर, केबल ३०. राज्य विधिमंडळातील सदस्य ३१. युवक ३२. एक लाख ३४. पाण्याचा पाट ३५. त्वरा ३९. नेत्रांजन ४०. संकटातून वाचवणारा ४१. कुंभ, घट ४२. पंख असलेली काल्पनिक सुंदरी ४३. प्रेयसी, पत्नी ४५. राजाचा लेखनिक ४६. झावळीच्या पातीतील काडी ४७. शोक, रुदन ४८. असूया ४९. डोंगराची शिखरे काबीज करण्याचा क्रीडाप्रकार ५०. खाबूगिरी, लाचलुचपत ५१. पुराणातील घोडागाडी ५४. मावशीचा मुलगा ५५. कंत्राट ५७. अंदाज घेणे ५९. परीक्षा, कसोटी, तपासण्याची क्षमता ६१. नियंत्रण ६२. झाडाच्या तळाशी जमणारा कचरा ६३. जीत, सरशी ६४. गंध, राहणे ६५. थांबणे, विश्रांती घेणे ६६. आक्षेप ६९. जाळणे, अग्निसंस्कार ७१. गुलाम, सेवक ७३. मजूर ७६. पुरुषांच्या गळ्यातला मोत्यांचा चार पदरी माळेसारखा अलंकार ७७. सरपण विक्रीचे ठिकाण ७८. पिल्लांचा समूह ७९. दह्याचे पाचक पेय ८०. सर्वजण ८१. किताब, पदवी ८२. तेजस्वी ८३. मासे पकडण्याचे मोठे जाळे ८५. भिस्त ८६. जाणकार चाहता ८७. अतिरेक, जुलूम ८८. गणपतीचे एक नाव ९०. कष्टाला सरावलेला ९३. बुरखा ९५. आघाताची त्वचेवरील खूण •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३५१चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. गौडबंगाल ६. साहित्यिक ९. ऊर्मी ११. डाळिंबी १३. वगर १४. टुकार १६. कृषी १७. काबीज करणे १९. मोका २०. ताक २१. शैशव २२. जाणे २३. भागभांडवल २५. डावली २७. तगमग ३०. खोटी ३३. दान ३४. गोड ३५. चिवट ३६. अनमानधपका ४०. सोने ४१. साद ४२. बिलवर ४३. सदा ४४. विरक्त ४५. तळ ४६. सलाम ४८. कलिका ५१. गुरू ५२. चाड ५३. दमा ५५. कृष्णा ५६. कढीपत्ता ५९. भर ६०. रतीब ६२. तरकश ६५. लग ६६. माय ६७. रास ६८. दारा ७०. कपाळ ७३. डालगे ७५. पाखर ७६. मगर ७८. अटन ७९. नाका ८१. जाळ ८२. शीर ८३. मशाल ८४. मध्य ८५. वाट ८७. टीच ८८. उकल ९०. बगळा ९३. बदक ९५. सखा ९७. आमटी ९८. पितळ १००. तसू १०२. रंगाचा बेरंग १०३. साठा १०४. चेहरा १०५. एडका १०७. मुभा १०८. अघू १०९. चंपी ११०. टाकळा १११. पुचाट ११२. कढी ११३. गोची ११४. धुनी

**उभे शब्द** : १. अळिंबी ३. डवरणे ४. गाव ५. लगबग ७. हिसकावणे ८. कटुता ९. ऊर १०. कृषीवल ११. डाकाईत १२. बीज १५. काकडा १६. कृश १८. कजाग १९. मोड २१. शैली २३. भाटी २४. भांबावलेला २६. वजन २८. गदा २९. मनसोक्त ३०. खोडसाळ ३१. मानव ३२. विपदा ३६. अलगद ३७. मारक ३८. धसका ३९. पवित्रक ४५. तरू ४६. सड ४७. महती ४९. लिपीक ५०. कृष्णावळ ५१. गुत्ता ५२. चार ५४. मात ५७. ढील ५८. पगडा ५९. भय ६०. रसरशीत ६१. बदाम ६३. रया ६४. शकट ६६. मागे ६७. राख ६९. राग ७१. पानमळा ७२. मैना ७४. लड ७५. पाळ ७७. रमल ७८. अलबत्त ८०. कावा ८१. जाच ८६. टब ८७. टीक ८८. उमग ८९. कटी ९१. गळचेपी ९२. अतएव ९४. दस्ता ९५. सगा ९६. खाचाखोचा ९७. आरंभ ९८. पिठा ९९. खुरासनी १०१. सूड १०२. रंभा १०३. साधू १०६. काटा १०७. मुळा १०८. अढी १०९. चंची

## मेष

**आठवड्याच्या** सुरुवातीला तुम्हाला फारसा उत्साह वाटणार नाही. कामाचे नियोजन अवश्य करावे. निर्णय घेण्यात आणि प्रत्यक्ष कृती करण्यात दिरंगाई नको. कामामध्ये सातत्य ठेवावे लागेल. मनाप्रमाणेच प्रत्येक गोष्ट घडेल असे नाही. आर्थिक आवक चांगली राहील मात्र खर्चही वाढेल. कुटुंबातील काही मतभेद सुसंवादाने दूर होतील धार्मिक स्थळांना भेटी द्याल. संततीबाबत भावनेच्या भरात निर्णय घेऊ नका. त्यांच्या हितासाठी प्रसंगी कठोर व्हावे लागेल. भावंडे, मित्रपरिवार यांच्याशी गैरसमज होणार नाही याची काळजी घ्या.

नोकरी व व्यवसायात हितशत्रू, स्पर्धक ओळखून तुमची रणनीती ठरवावी. आक्रमक न होता हाती घेतलेले काम पूर्ण करा. कामाची गती वाढवावी लागेल. भागीदारीत व्यवसाय असल्यास सुसंवाद ठेवा. व्यवहारात पारदर्शकता ठेवावी. मोठी गुंतवणूक टाळा. घरगुती खाद्यपदार्थ, पर्यटन, कायदा, सामाजिक क्षेत्र, तंत्रज्ञ, वैद्यकीय व्यवसाय, आर्थिक क्षेत्र, या संबंधित व्यक्तींना चांगला काळ आहे.

पायांचे दुखणे, पोटाच्या समस्या, हृदयविकार, श्वसनविकार या तक्रारी जाणवतील. मानसिक आरोग्याची काळजी घ्या.

**शुभ दिनांक** : २६, २७, २८.

## वृषभ

**मनामध्ये** कुठलीही भीती, हुरहुर न बाळगता आत्मविश्वास ठेवून तुमच्या कामाचे नियोजन करा. भावना व व्यावहारिकता याची सांगड घालावी लागेल. आठवड्याचा उत्तरार्ध चांगला ठरेल. ठरवलेली कामे व्यवस्थित पार पाडू शकाल. आर्थिक स्थिती चांगली राहील. कुटुंबाची जबाबदारी घ्यावी लागेल. कौटुंबिक हितासाठी अलिप्त धोरण ठेवून कठोर निर्णय घ्यावे लागतील. व्यवहार चोख ठेवा. संततीबरोबर प्रवास कराल. मित्रपरिवार सहकार्य करेल. आंधळा विश्वास नको.

व्यावसायिक उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कामामध्ये सातत्य ठेवावे लागेल. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. व्यवसायवाढीसाठी तुमच्या कार्यशैलीमध्ये आधुनिक पद्धतीचा उपयोग करा. मोठी आर्थिक गुंतवणूक पुढे ढकला. हितशत्रूंवर मात करू शकाल. अडथळे आले तरी त्यातून मार्ग निघेल. राजकारण, जाहिरात क्षेत्र, भाषा, खाद्यपदार्थ, गायक, कलाकार, खेळाडू, यांच्यासाठी चांगला काळ आहे.

रोगप्रतिकारशक्ती कमी असणे, पोटाच्या समस्या,घशाचे विकार, मधुमेहासंबंधित आरोग्याच्या तक्रारी राहतील. पडणे, जखम होणे यासारखे त्रास होऊ शकतात.

**शुभ दिनांक** : २७, २८, २९.

## मिथुन

**अनपेक्षित** मिळणाऱ्या संधी, जबाबदारीसाठी तयार राहा. अनेक आघाड्यांवर लढावे लागेल. स्वतःची क्षमता, कौशल्य सिद्ध कराल. मात्र त्यामुळे मानसिक ताणही जाणवणार आहे. अनावश्यक भीतीवर नियंत्रण मिळवल्यास अनेक गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाबतीत तुमचे अंदाज योग्य ठरतील. संततीसाठी अनपेक्षित खर्चाची तरतूद करून ठेवावी. जोडीदाराचा सकारात्मक दृष्टिकोन उपयोगी पडेल.भावंडांना मदत करावी लागेल. घरामधील अनावश्यक वादविवाद टाळा.

नोकरीत सहकाऱ्यांचा गैरसमज त्रासदायक ठरू शकतो. वेळीच काळजी घ्या. संयम व सातत्य यामुळे ठरवलेली कामे पार पाडाल. कामाचा वेग वाढवावा लागेल. संभ्रमावस्था निर्णय घेण्यास अडचणी निर्माण करेल, त्यासाठी कार्यक्षेत्रातील अनुभवी व्यक्तीचा सल्ला जरूर घ्यावा. तंत्रज्ञ, सेवा क्षेत्र, सरकारी क्षेत्र, कायदा, निवेदक, व्यवस्थापन, वैद्यकीय व्यवसाय संबंधित लोकांसाठी काळ चांगला आहे.

पोटाच्या समस्या, रक्तदाब, रक्तदोष, वाणी दोष, कानाच्या समस्या, ॲलर्जी, मानसिक अस्वस्थता याकडे दुर्लक्ष करू नका.

**शुभ दिनांक** : २४, २५, २८.

## कर्क

**सकारात्मक** दृष्टिकोन या आठवड्यात यश मिळवून देईल. प्रारंभी गोंधळल्यासारखी परिस्थिती असली तरीही व्यवहारचातुर्याचा उपयोग होईल. अतिभावनाशील होणे योग्य नाही. अनपेक्षित येणाऱ्या संधीसाठी तयार रहा. आर्थिक स्थिती चांगली राहील. छोट्या छोट्या गुंतवणुकीवर भर द्या. मोठ्या खर्चावर मात्र नियंत्रण ठेवावे लागेल. कुटुंबाची जबाबदारी तुम्हाला घ्यावी लागेल. वडिलोपार्जित संपत्तीबाबत काही प्रश्न असल्यास वाद वाढू शकतो. आजी-आजोबांची काळजी घ्यावी. जोडीदाराशी वागताना सुसंवाद व पारदर्शकता ठेवा म्हणजे नात्यामध्ये दुरावा येणार नाही.

भागीदारीत व्यवसाय असल्यास ताणतणाव कमी करण्यास प्राधान्य द्या. नवीन व्यवहार करताना कागदपत्रांची खातरजमा करून घ्या. सरकारी नोकरवर्गाने नियमांचे कसोशीने पालन करावे. सरकारी क्षेत्र, संशोधन, वैद्यकीय व्यवसाय, कलाकार, व्यवस्थापन, खेळ यासंबंधी व्यक्तींना यश मिळू शकेल.

नेत्रविकार, खाद्यपदार्थांची ॲलर्जी, हाडे, पोषक मूलद्रव्यांची कमतरता या संबंधित तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. वाहन चालवताना काळजी घ्या.

**शुभ दिनांक** : २५, २६, २७.

## सिंह

**तुमचा** राशी स्वामी रवी स्वराशीत आहे. आत्मविश्वास वाढेल. काही पथ्य पाळणे मात्र आवश्यक ठरेल. अहंकार, बोलणे यावर नियंत्रण ठेवा. उत्तम व्यवस्थापन व नियोजन हे तुमचे कौशल्य तुम्हाला उपयोगी पडेल. स्वतःच्या चुका स्वीकारून त्यात सुधारणा करावी. कामाचा व्याप वाढणार आहे. तत्कालिक लाभापेक्षा भविष्यातील मोठ्या फायद्याचाही विचार करावा. कौटुंबिक आघाडी सांभाळताना कसरत होणार आहे. संततीसंबंधी चांगली बातमी कळेल. जोडीदाराशी गैरसमज होणार नाही याची काळजी घ्यावी. विवाह ठरवत असाल तर सावधगिरी बाळगावी.

नोकरदारांनी वरिष्ठांची मर्जी सांभाळावी. नोकरीत बदल करायचा असल्यास तो विचार पुढे ढकलावा. नोकरदार व व्यावसायिकांना कामानिमित्त प्रवास करावा लागेल. कार्यक्षेत्रातील नवीन ओळखीच्या लोकांपासून सावध राहावे. सामाजिक प्रतिष्ठा सांभाळावी. वैद्यकीय व्यवसाय, व्यवस्थापन, इव्हेंट मॅनेजमेंट, सेवा क्षेत्र, गुप्तचर विभाग, घरगुती खाद्यव्यवसाय, तंत्रज्ञान यासंबंधी क्षेत्रामध्ये यश मिळू शकते

उष्णतेचे विकार, तोंड येणे, रक्तदोष, नेत्रविकार, मज्जा संस्था, कानाचे दुखणे, पायांची दुखणी यासंबंधी आरोग्याच्या तक्रारी राहतील.

**शुभ दिनांक** : २४,२५,२८, २९

## कन्या

**या** आठवड्याचे ग्रहमान पाहता तुम्ही सावधगिरीने निर्णय घ्यावेत. मन शांत व स्थिर ठेवून तुमच्या कार्यशैलीत येणाऱ्या परिस्थितीनुसार बदल करावे लागतील. आर्थिक लाभ होताना दिसत आहेत. गरज पडेल तेव्हाच धाडसी स्वभाव दाखवा. कामाचा वेग हळू असला तरीही कामे पूर्ण होतील. घराकडे दुर्लक्ष करू नका. कौटुंबिक सदस्यांना एकत्र बांधून ठेवण्याचे काम तुम्ही करू शकाल. सत्य गोष्टी सौम्य शब्दात सांगितल्यामुळे कोणीही दुखावणार नाही. कुटुंबाचा एकत्रित व्यवसाय असल्यास फायदा होईल. जोडीदार व संततीचे सहकार्य मिळेल. भावंडे व मित्रपरिवाराशी संघर्ष टाळावा.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन कल्पना, योजना प्रत्यक्षात आणता येतील. कृपया कारवायांना तोंड द्यावे लागेल. कामानिमित्त प्रवास करावे लागतील त्यासाठी जास्तीच्या खर्चाची तयारी ठेवा. धार्मिक क्षेत्र, शैक्षणिक व आर्थिक क्षेत्र, तंत्रज्ञ, सरकारी विभाग, सल्लागार यांच्यासाठी चांगला काळ आहे.

हृदयरोग, नेत्रविकार, हाडांचे विकार, कफ व वातविकार, हार्मोन्स, रक्तदाब,




# राशिभविष्य

**रविवार २४ ऑगस्ट २०२५ ते शनिवार ३० ऑगस्ट २०२५**

**- ज्योतिषपंडित प्रज्ञा धनंजय, पुणे.**

पचनविकार, श्वसनविकार या संबंधित आरोग्याच्या तक्रारी राहतील.

**शुभ दिनांक** : २४, २५.२७

## तूळ

**हा** आठवडा तुमच्यासाठी सर्वसाधारणपणे चांगला जाईल. कर्माला भाग्याची साथ आहे. कामांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यावर लक्ष केंद्रित करा. कर्तृत्वास चालना मिळेल. आर्थिक आवक व जावक सारखीच राहील. प्रवास करावा लागेल. मनाचा उत्साह टिकवून ठेवावा लागेल. कुटुंबासाठी जास्तीच्या खर्चाची तरतूद करून ठेवा. घरातील ज्येष्ठांच्या, संततीच्या तब्येतीची काळजी घ्यावी. जोडीदाराशी मतभेद होतील. भावंडे, मित्रपरिवाराकडून मर्यादित सहकार्य मिळेल.

नोकरदार व्यक्तींनी वरिष्ठांचे सहकार्य घेऊन आपल्या कामाची गती वाढवावी. व्यवसायवृद्धीसाठी नवीन योजना उपयोगी पडतील. रेंगाळलेली कामे पूर्ण होतील. भांडवल उभे करताना अडथळे येतील. स्टॉक मार्केट, पर्यटन, सेवा क्षेत्र, जाहिरात, धार्मिक क्षेत्र, कला व आर्थिक क्षेत्र यासंबंधी व्यक्तींना यश मिळेल.

हार्मोन्स, अनुवंशिक आजार, ॲलर्जी, त्वचाविकार, संसर्गजन्य आजार, आतड्यांना सूज येणे अशा आरोग्याच्या तक्रारी उद्‌भवण्याची शक्यता आहे. मानसिक तणाव जाणवेल.

**शुभ दिनांक** : २४, २५, २७, २९.

## वृश्चिक

**आठवड्याची** सुरुवात चांगली होईल. केलेल्या कष्टाचे फळ निश्चित मिळेल. हातून चूक झाल्यास तत्काळ सुधारून घ्यावी नाहीतर उत्तरार्धात त्याचा फटका बसू शकतो. आर्थिक घडी प्रयत्नपूर्वक बसवावी लागेल. उत्साह टिकवून ठेवा. मनामध्ये अस्वस्थता राहील. त्यामुळे कुठलाही निर्णय घेताना चूक होऊ शकते. घरातील ज्येष्ठांची, मातापित्यांची काळजी वाटेल. जोडीदाराशी मतभेद झाले तरी सहकार्य मिळेल. संततीला समजून घ्या. मित्रपरिवाराची साथ राहील.

नोकरीत बदल करण्यासाठी संधी दिसत असली तरी पूर्ण माहिती घेतल्याशिवाय बदल करू नका. नोकरदार व व्यावसायिकांनी नवीन व्यवहार करताना वाटाघाटी काळजीपूर्वक कराव्यात. कायदेतज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य ठरेल. जबाबदारी वाढली तरी अधिकाराचा वापर मर्यादित राहील. त्याप्रमाणे तुमचे निर्णय घ्यावे. सरकारी व सामाजिक क्षेत्र, परदेश व्यापार, रियल इस्टेट, व्यवस्थापन, धार्मिक क्षेत्र, वैद्यकीय व्यवसाय या संबंधित क्षेत्रात यश मिळेल.

अनुवंशिक आजार, हार्मोन्स, मधुमेह, हाडांचे विकार, श्वसन व पचनाचे विकार या आरोग्याच्या तक्रारी राहतील.

**शुभ दिनांक** : २४, २५, २६, २७.

## धनु

**सर्वसाधारणपणे** या आठवड्याचा उत्तरार्ध चांगला जाईल. आत्मविश्वास व उत्साह कायम ठेवा. निर्णय घेण्यात उशीर करू नका. गरज पडल्यास तज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्या. महत्त्वाकांक्षेला व्यवहाराची जोड द्या. गुरुकृपा आहे. आर्थिक व्यवहार मार्गी लागतील. मानसन्मान वाढेल. वडिलांची व घरातील ज्येष्ठांची काळजी घ्यावी. जोडीदाराला तुमच्या मदतीची गरज लागेल. संततीचे सहकार्य मिळेल. संघर्ष टाळा.

कार्यक्षेत्रामध्ये मिळणाऱ्या नवीन संधीचे सावधगिरीने स्वागत करा. बुद्धिचातुर्य, कार्यकुशलता यामुळे यश मिळेल. कुणावरही अवलंबून राहू नका. तुम्हीच कामाची गती वाढवावी. मान्यवरांच्या ओळखी उत्साह वाढवतील. नोकरदारांनी नियमाप्रमाणे व संयमाने काम करावे. सरकारी व सामाजिक क्षेत्र, परदेश व्यापार व राजकारण, पोलीस व सैन्य दल, तंत्रज्ञ, उत्पादक, जाहिरात क्षेत्र, वैद्यकीय व्यवसाय संबंधित क्षेत्रामध्ये असणाऱ्यांना यश मिळू शकेल.

अनुवंशिक आजार, प्रतिकारशक्ती कमी असणे, झोपेचे विकार, कान, पोटाच्या समस्या, श्वसन, कफवृद्धी, अशक्तपणा यासारख्या आरोग्याच्या समस्या राहतील.

**शुभ दिनांक** : २६, २७, २८, २९.

## मकर

**आठवड्याचा** उत्तरार्ध यश देणार आहे. अवघड गोष्टीसुद्धा साध्य करण्याचा निश्चय करा. तुमच्यातील व्यवहारचातुर्य व भावनाशीलता याचा समन्वय साधा. बोलण्यामुळे गैरसमज होणार नाहीत याची काळजी घ्या. आर्थिक गुंतवणूक तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच करा किंवा शक्य झाल्यास पुढे ढकला. फसवणुकीची शक्यता आहे. मनामध्ये विचारांची गर्दी होऊ देऊ नका. कामानिमित्त प्रवास करावा लागेल. कुटुंबापासून लांब जाऊनसुद्धा जबाबदारी टाळता येणार नाही. घरामध्ये संघर्ष टाळा. जोडीदार व संततीशी सुसंवाद राहील. विवाहाची बोलणी चालू असल्यास यशस्वी होतील.

कार्यक्षेत्रात विरोधी वातावरण असले तरीही तुम्ही मार्ग काढू शकाल. योजनाबद्ध हालचाली व पर्यायी व्यवस्था उपयोगी पडेल. नोकरदारांना वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. विरोधकांना उत्तर देण्यात वेळ वाया घालवू नका. अहंकार त्रासदायक ठरू शकतो. संशोधनक्षेत्र, मासमीडिया, शेअर मार्केट, वैद्यकीय व्यवसाय, सेवा क्षेत्र, मार्केटिंग या क्षेत्रासाठी चांगला काळ आहे.

खाण्यातून संसर्ग, प्रतिकारशक्ती कमी होणे, हृदयविकार, श्वसनविकार, मधुमेह, रक्तदोष, सांधेदुखी, झोपेच्या समस्या अशा तक्रारी राहण्याची शक्यता आहे.

**शुभ दिनांक** : २७, २८, २९.

## कुंभ

**महत्त्वाची** कामे पूर्वार्धात करून घ्या. उत्साह कायम ठेवावा लागेल. मनामध्ये अस्वस्थता, अकारण भीती राहील. त्यावर नियंत्रण ठेवा. अनेक आघाड्यांवर लढण्यापेक्षा कामाचा प्राधान्यक्रम ठरवून त्यावरच लक्ष केंद्रित करा. प्रत्येक गोष्टीचे नियोजन, व्यवस्थापन महत्त्वाचे राहणार आहे. आर्थिक स्थिती चांगली राहील. गुंतवणूक सावधगिरीने करा. घरामध्ये विशेषतः भावंडांशी संघर्ष टाळा. जोडीदार व तुमच्यामध्ये अहंकार येऊ देऊ नका. संततीकडे विशेष लक्ष असू द्या. बोलण्यामुळे गैरसमज होऊ शकतात.

नोकरीव्यवसायात अडथळे पार करावे लागतील. भागीदारीत पारदर्शकता असू द्या. सामाजिक प्रतिष्ठा सांभाळावी लागेल. सौम्य व योग्य शब्दात आपली मते मांडावी. व्यवहारकौशल्य पणास लागणार आहे. मास मीडिया, शिक्षण क्षेत्र, वाणिज्य शाखा, वकीली, सरकारी विभाग, राजकारण, लेखन संबंधित व्यक्तींना चांगला काळ आहे.

वातविकार, पोटाच्या समस्या, दंतविकार, पडणे, जखम होणे, कफवृद्धी, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे, साथीचे विकार यापासून जपा.

**शुभ दिनांक** : २४, २५.

## मीन

**महत्वाची** कामे आठवड्याच्या पूर्वार्धात करून घ्या. स्वतःची क्षमता ओळखून कामाचे नियोजन करा. भावनिक होऊन चालणार नाही. बुद्धीला न पटणाऱ्या घटना घडत असल्या तरी स्थिर मनाने निर्णय घ्यावे लागतील. आत्मविश्वास गमावू नका. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहील. एकाकीपणा जाणवू शकतो. कुटुंबामध्ये चांगले वातावरण ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. कुटुंबाचा एकत्रित व्यवसाय असल्यास फायदा होईल. जोडीदाराची मते ऐका. विनाकारण नात्यामध्ये दुरावा येणार नाही याकडे लक्ष द्या. मित्रांवर आंधळा विश्वास ठेवू नका.

नोकरदारांना छुप्या कारवायांना तोंड द्यावे लागेल. अधिकारी वर्ग सहकार्य करू शकणार नाही. व्यावसायिकांनी कामाची गती वाढवावी. भागीदारीतील व्यवसाय फायदेशीर असला तरीही मतभेद टाळावेत. येणाऱ्या नवीन संधीचा जरूर लाभ घ्यावा. आर्थिक गुंतवणूक पुढे ढकला. कलाक्षेत्र, बौद्धिक क्षेत्र, सरकारी विभाग, उत्पादक, मास मीडिया यांच्यासाठी चांगला काळ आहे.

हृदयविकार, पित्ताशय, यकृत, हार्मोन्स, कफ विकार, झोपेच्या समस्या, नेत्रविकार, त्वचा विकार या आरोग्याच्या समस्या जाणवण्याची शक्यता आहे.

**शुभ दिनांक** : २४, २५, २६, २७.

# नवाकाळ

• पुणे । रविवार २४ ऑगस्ट, २०२५ • पान -८


## पुण्याच्या दगडूशेठ गणपती मंडळाचा ५० कोटींचा विमा



**पुणे -** पुण्यातील प्रसिद्ध श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाने तब्बल ५० कोटी रुपयांचा विमा काढला आहे. या विम्यात चेंगराचेंगरी, अतिरेकी हल्ला, हवाई हल्ला अशा आपत्कालीन प्रसंगांसाठी सुरक्षा कवच असणार आहे. अपघाती मृत्यू झाल्यास ५ लाख रुपये, अपंगत्व आल्यास २ लाख रुपये, तर जखमी झालेल्या व्यक्तीला ५० हजार रुपयांपर्यंत औषधोपचार खर्च दिला जाणार आहे. ही सुविधा संपूर्ण उत्सवकाळासाठी असेल.

## आता ओबीसी समाजामध्ये नवीन २९ जातींचा समावेश?

**आयोगाची सरकारकडे शिफारस**

■ मुंबई

**राज्याच्या** ओबीसी जातींच्या महाराष्ट्राच्या यादीत आता नव्या २९ जातींचा समावेश करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाने राज्य सरकारकडे शिफारशीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवला आहे. राज्य सरकारने मान्यता दिल्यास हा प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे जाणार आहे.

राज्यात ओबीसीमध्ये ३५१ मूळ जाती आणि त्यांच्या अनेक उपजाती आहेत. आता राज्यातील अन्य २९ जातींचा राज्याच्या ओबीसी जातींच्या यादीत समावेश करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाने राज्य सरकारकडे मागणी केली आहे. नवीन २९ जातींमध्ये लोध, लोधा, लोधी, बडगुजर, पेंढारी, वीरशैव लिंगायत, लिंगायत गुरव तसेच लिंगायतमधील जंगम, न्हावी, तेली, माळी, धोबी, फुलारी, पोवार, भोयर, पवार, गुजर, रेवा गुजर, सूर्यवंशी गुजर, बेलदार, सलमानी, किराड, डांगरी, कलवार, कुलवंत वाणी, वाणी (कुलवंत), कुमावत, नेवेवाणी, वरठी, परीट, धोबी, पटवा, सपलिग, सपलिगा, निषाद, मल्लाह, कुंजडा, दोरी, ईस्ट इंडियन, ईस्ट इंडियन ख्रिश्चन, शेगर, कानोडी, गवलान आदि जातींचा समावेश आहे. यावर ओबीसी नेत्यांची प्रतिक्रिया काय असेल याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## मध्य रेल्वे लोकल मार्गावर आज मेगाब्लॉक घेणार

■ मुंबई

**मध्य** रेल्वेवर अभियांत्रिकी व देखभालीच्या कामांसाठी उद्या रविवारी २४ ऑगस्ट रोजी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे.सकाळी ११.०५ ते ३.५५ या कालावधीत मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मेगाब्लॉक कालावधीत धीम्या मार्गावरील विद्याविहार, कांजूरमार्ग, नाहूर रेल्वे स्थानकांचा थांबा रद्द असेल. मध्य रेल्वेवर ब्लॉक कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून अप आणि डाऊन धिम्या मार्गावरील लोकल माटुंगा आणि मुलुंड स्थानकादरम्यान जलद मार्गावर वळवल्या जाणार आहेत. या गाड्या शीव, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडुप आणि मुलुंड स्थानकांवर थांबतील. नियोजित वेळेपेक्षा १५ मिनिटे उशिराने गंतव्यस्थानी पोहोचतील. ठाणे आणि वाशी/नेरूळ स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन ट्रान्स हार्बर मार्गावर सकाळी ११ ते संध्याकाळी ४.१० या कालावधीत मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. ब्लॉक काळात पनवेल, वाशी, नेरूळ आणि ठाणे स्थानकादरम्यान अप आणि डाऊन ट्रान्स-हार्बर मार्गावरील सेवा बंद राहतील.

## 'खालिद का शिवाजी' सिनेमा बंदी तातडीने सुनावणीस नकार

■ मुंबई

**खालिद** का शिवाजी या चित्रपटामुळे छत्रपती शिवाजी महाराजांची धर्मनिरपेक्ष अशी प्रतिमा तयार होत असल्याचा आरोप करत काही उजव्या विचाराच्या लोकांनी या चित्रपटाबाबत तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची तातडीने दखल घेत सेन्सॉर बोर्डाने चित्रपटाच्या प्रदर्शनाआधी एक दिवस असताना या चित्रपटाचे सेन्सॉर प्रमाणपत्र रद्द केले. या प्रकरणी न्याय मिळावा म्हणून चित्रपटाच्या निर्मात्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. या खटल्याची सुनावणी तातडीने करून चित्रपट निर्मात्याला दिलासा देण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. या प्रकरणावरील पुढील सुनावणी २२ सप्टेंबरला होणार आहे. 'खालिद का शिवाजी' हा चित्रपट अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातही गेला होता. कान्स चित्रपट महोत्सवातही तो महाराष्ट्र




सरकारच्या वतीने पाठवण्याचे ठरले होते. मात्र काही लोकांनी तक्रार दाखल केल्यानंतर राज्य शासनानेही हा » पान २ वर

## उपसमिती सरकारचे जुने खूळ! मनोज जरांगेंचा टोला

■ जालना

**मराठा** समाजाच्या उपसमितीच्या अध्यक्षपदी चंद्रकांत पाटील यांच्या जागी अध्यक्ष म्हणून राधाकृष्ण विखे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या बदलावर मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. ही समिती म्हणजे जुनेच खुळ असून फक्त पोळ्याच्या दिवशी खांदे बदलले आहेत, असा टोला त्यांनी सरकारला लगावला. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा-कुणबी एक आहेत, असा जीआर काढा. यासाठी कॅबिनेट बैठक घ्या. मराठा आंदोलकांवरील केसेस मागे घ्या आणि शहीद झालेल्या कुटुंबांना मदत द्या.

## भिवंडी शहरात खड्ड्यांमुळे दुचाकीस्वार डॉक्टरचा मृत्यू

■ मुंबई

**भिवंडी** शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था पुन्हा एकदा जीवघेणी ठरली. वंजारपट्टी नाक्यात खड्ड्यांमुळे दुचाकी घसरून मोहम्मद नशीम अन्सारी (५८) या डॉक्टरचा मृत्यू झाला. वंजारपट्टी नाका येथील ढाब्यावर जेवण करून अन्सारी दुचाकीवरून घरी जात होते. राज हॉस्पिटलसमोरील रस्त्यावर असलेल्या खड्ड्यात त्यांची दुचाकी घसरली. त्याचवेळी मागून येणाऱ्या कंटेनरखाली ते चिरडले गेले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, वंजारपट्टी नाका येथील एपीजे अब्दुल कलाम उड्डाणपुलावर खड्डे बुजवण्याचे काम सुरू असल्याने अवजड वाहनांची वाहतूक खालून वळवण्यात आली होती. याचदरम्यान ही दुर्घटना घडली. या अपघातानंतर संतप्त नागरिकांनी अवजड वाहन वाहतूक बंद करण्याची मागणी करत रास्ता रोको आंदोलन केले. प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत त्यांनी भिवंडीत रस्त्यांमुळे आतापर्यंत तिघांचा बळी गेला.




**'मरोळचा मोरया'** अंधेरी पूर्वेतील मरोळ येथील शिवगर्जना तरुण मित्र मंडळाच्या 'मरोळचा मोरया'ची कागदी लगद्याची मूर्ती साकारण्यात आली. ही मूर्ती पाहण्यासाठी लोकांची गर्दी झाली होती.

## गुजरातमध्ये गाजलेले 'धोतीया'कांड २९ वर्षांनंतर खटला काढून टाकला

■ अहमदाबाद

**गुजरातच्या** राजकारणात एकेकाळी प्रचंड गाजलेल्या 'धोतीया'कांड प्रकरणातील खटला तब्बल २९ वर्षांनंतर न्यायालयाच्या संमतीने काढून टाकण्यात आला.

मे १९९६ मधील ही घटना आहे. अहमदाबादमध्ये भाजपा पदाधिकाऱ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी मेळाव्याला संबोधित केले. या कार्यक्रमादरम्यान पक्षांतर्गत वादातून गुजरातच्या शंकरसिंह वाघेला सरकारमधील तत्कालीन मंत्री आत्माराम पटेल यांचे धोतर भाजपाच्या दोन नेत्यांनी खेचले होते. त्यावरून प्रचंड गदारोळ माजला होता. आत्माराम पटेल यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी माजी केंद्रीय मंत्री अमृतलाल पटेल आणि भाजपा पदाधिकारी मंगलदास पटेल यांच्या विरोधात जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदविला होता.

हा खटला बरीच वर्षे चालला. दरम्यानच्या काळात एक आरोपी मंगलदास पटेल यांचे निधन झाले. फिर्यादी आत्माराम पटेल यांचेही २००२ मध्ये निधन झाले. जे आरोपी हयात आहेत त्या अमृतलाल पटेल यांचे वय सध्या ९५ वर्षे आहे. या संपूर्ण प्रकरणाचा विचार करता आता हा खटला पुढे चालविण्यात कोणाचेही हीत नाही.

## श्रीकृष्णाला माखन चोर म्हणू नका मुख्यमंत्री मोहन यादवांच्या वक्तव्याने वाद

■ भोपाळ

**भगवान** श्रीकृष्णाला माखन चोर म्हणणे योग्य नाही. कृष्णाने केलेली लोण्याची चोरी हे कंसाच्या विरोधातील बंड होते, असे विधान मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी करून नव्या वादाला तोंड फोडले. मोहन यादव सनातन धर्मातील परंपरा नव्याने लिहू पाहत आहेत, अशी टीका काँग्रेसने केली.

कृष्ण जन्माष्टमीनिमित्त झालेल्या एका कार्यक्रमात बोलताना यादव म्हणाले की, भगवान श्रीकृष्णाच्या बाबतीत माखन चोर ही उपाधी ऐकून कसेतरी वाटते. कृष्ण आपल्या सवंगड्यांना सोबत घेऊन लोणी चोरून खायचा. सवंगड्यांना खाऊ द्यायचा. खरेतर श्रीकृष्णाचा राग कंस मामावर होता. कंस मामा आपल्या हक्काचे सर्व काही हिरावून नेतो असे कृष्णाला वाटायचे. त्याच्याविरुद्ध बंडखोरी म्हणून श्रीकृष्ण दही-लोण्याची चोरी करायचा. या कृत्यातून त्याला एक संदेश द्यायचा होता. हे समजून न घेता सरसकट लोक कृष्णाचा उल्लेख माखन चोर असा करतात ते योग्य नाही.

यादव यांचे हे वक्तव्य काही वेळातच सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यावर टीका करताना काँग्रेसचे नेते आणि मध्य प्रदेश विधानसभेतील विरोधी पक्षनेते उमंग सिंघर म्हणाले की, यादव भगवान कृष्णाची जीवनकथा मोडतोड करून नव्याने लिहू पाहत आहेत. त्यांना स्वतःच्या नजरेतून सनातन धर्म नव्याने लिहायचा आहे. हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या सनातन धर्माचा इतिहास त्यांना बदलायचा आहे काय?

## कोकाटे-रोहित पवार यांच्यात मानहानीच्या नोटिशीवरून वाद

■ मुंबई


**विधानसभेच्या** सभागृहात माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे तब्बल १८ ते २२ मिनिटे पत्ते (रमी) खेळत होते, असा आरोप शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्हिडिओ पोस्ट करत केला होता. या आरोपानंतर कोकाटे यांच्यावर टीकेची झोड उठली आणि काही दिवसांतच त्यांचे खाते बदलण्यात आले. हे प्रकरण संपले असे वाटत असतानाच कोकाटे यांनी रोहित पवार यांना मानहानीची नोटीस बजावली. या नोटिशीवर रोहित पवार म्हणाले की, कोकाटे सभागृहात पत्ते खेळतानाचा व्हिडिओ मी जगजाहीर केला म्हणून मला मानहानीच्या दाव्याची नोटीस आली आहे. तुमचा काळ आला होता, पण वेळ आली नव्हती म्हणून वाचलात. मानहानीची एवढी काळजी होती, तर पत्ते खेळलातच कशाला? मी पुराव्याशिवाय बोलत नाही. सभागृहात तुम्ही पत्ते खेळत होतात हे मी सिद्ध केले होते.

## पंजाबमध्ये एलपीजी टँकरचा स्फोट दोन जणांचा मृत्यू! ३० जण जखमी

■ चंदीगड

**पंजाबमधील** होशियारपूरमध्ये काल रात्री एलपीजी गॅसच्या टँकरचा स्फोट झाला. यात १५ दुकाने आणि ४ घरे जळून खाक झाली. या आगीत २ जणांचा मृत्यू झाला तर ३० जण जखमी झाले. जखमींना होशियारपूर सिव्हिल रुग्णालयात दाखल केले असून, त्यातील काही जण ३० ते ८० टक्के भाजले आहेत. यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जाते.

होशियारपूरमध्ये मंडियाला गावाजवळ एका मिनी ट्रकने एलपीजी गॅसने भरलेल्या टँकरला जोरदार धडक दिली. या धडकेने टँकर उलटला आणि त्याला आग लागली. गॅस गळतीमुळे काही वेळातच आगीने आजूबाजूच्या परिसराला वेढा घातला. आगीची माहिती मिळताच होशियारपूर, दसुहा आणि तलवाडा येथून अग्निशमन दलाचे अनेक बंब घटनास्थळी हजर झाले. यावेळी होशियारपूर-जालंधर राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला. महामार्गावरील सुमारे एक किलोमीटरचा परिसर रिकामा करण्यासाठी स्थानिकांना तेथून हलवण्यात आले. होशियारपूरच्या डीसी आशिका जैन यांनी सांगितले की, पहाटे १.३० वाजेपर्यंत आग आटोक्यात आली. होशियारपूर सिव्हिल सर्जन पवन कुमार यांनी म्हटले की, रात्री उशिरा २ मृतदेह रुग्णालयात आणले. गंभीर रुग्णांना होशियारपूरहून दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे.



मुंबईच्या प्रसिद्ध लालबाग राजा गणेशोत्सव मंडपात आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई केली आहे. गणेशोत्सवात लालबाग राजाच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी उसळत असते. (छाया : दीपक साळवी)

## कर्नाटकच्या धर्मस्थल प्रकरणाला कलाटणी! तक्रारदारालाच अटक

■ बंगळुरु

**कर्नाटकमध्ये** नेत्रावती नदीकिनारी असलेल्या धर्मस्थल परिसरात शेकडो लोकांना हत्या करून गाडून टाकण्यात आले आहे, अशी तक्रार करून खळबळ उडवून देणारा तक्रारदारच खोटा निघाला. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणालाच कलाटणी मिळाली असून, खोटी माहिती दिल्याबद्दल पोलिसांनी तक्रारदाराला अटक केली आहे.

सी. एन. चेन्नय्या असे या तक्रारदाराचे नाव आहे. धर्मस्थल परिसरात शेकडो लोकांचे मृतदेह गाडले आहेत. त्यापैकी अनेक महिला आहेत. त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करून त्यांची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर त्यांचे मृतदेह धर्मस्थल परिसरात गाडण्यात आले आहेत, अशी चेन्नय्या याने माहिती दिली होती. या प्रकरणात साक्ष दिल्याने आपले नाव गुप्त राखावे, अशी विनंती त्याने केली होती. त्यानुसार पोलिसांनी त्याची ओळख उघड केली नव्हती. तसेच त्याला संरक्षण दिले होते.

## नाशकात मराठी कुटुंबाला मारहाण मनसेकडून परप्रांतीयाला चोप

■ नाशिक

**नाशिक** रोडच्या जयभवानी रोड परिसरात एका परप्रांतीयाने स्थानिक रहिवासी लासुरे यांच्या गाडीला धडक दिली. याबाबत जाब विचारणाऱ्या मराठी कुटुंबावर दादागिरी करत त्याने त्यांना शिवीगाळ आणि मारहाण केली. या प्रकारानंतर जयभवानी रोड येथील मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी त्याला चोप दिला. परप्रांतीय चारचाकी शिकत असताना त्यांची गाडी लासुरे कुटुंबाच्या गाडीवर धडकली व गाडीचे नुकसान केले. लासुरे कुटुंबाने जाब विचारल्यानंतर त्याने शिवीगाळ केली. मराठी लोकांची काय औकात आहे, तुम्ही मराठी लोक भंगार राहतात असे परप्रांतीयाने म्हटले. त्यानंतर मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी परप्रांतीयाला त्यांनी समज दिली. परंतु त्या परप्रांतीयाने उर्मटपणे उत्तर दिले की, मला मराठी येत नाही.






## कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरू त्रिपाठींचा अपघाती मृत्यू

■ लखनौ

**रामटेकच्या** कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू हरेराम त्रिपाठी आणि त्यांची पत्नी बदामी त्रिपाठी यांचा आज पहाटे उत्तर प्रदेशातील कुशीनगर येथे अपघातात मृत्यू झाला. त्रिपाठी दाम्पत्य आपल्या कुटुंबियांसह मूळ गावी जात होते. ते रामटेकवरून काल सायंकाळी सहा वाजता निघाले होते. आज पहाटे सहा वाजताच्या सुमारास वाराणसी-गोरखपूर चौपदरी महामार्गावर त्यांच्या कारची एका उभ्या असलेल्या ट्रेलरला धडक बसली. या अपघातात त्रिपाठी आणि त्यांच्या पत्नीचा जागेवरच मृत्यू झाला तर कारचालक गंभीर जखमी झाला. या घटनेने शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्राला धक्का बसला आहे.

उत्तर प्रदेशातील देवरिया (कुशीनगर) येथे जन्मलेल्या त्रिपाठी यांनी प्राथमिक शिक्षणानंतर १९८६ मध्ये त्यांनी संस्कृत अभ्यासासाठी बनारस गाठले. रामाचार्य संस्कृत विद्यापीठातून उत्तीर्ण झाल्यानंतर संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठातून त्यांनी शास्त्री (पदवी), आचार्य (पदव्युत्तर) आणि पीएचडी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले होते.

## मनी लॉड्रिंग प्रकरणात के.सी. वीरेंद्र यांना अटक

**बंगळुरू-** कर्नाटकमधील काँग्रेसचे आमदार के. सी. वीरेंद्र यांना मनी लॉड्रिंग प्रकरणात आज अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) अटक केली. सिक्कीममधील गंगटोक येथे बेकायदेशीर ऑनलाईन आणि ऑफलाईन सट्टेबाजीत सहभागी असल्याच्या आरोपाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत ईडीने १२ कोटी रुपयांची रोख रक्कम आणि ६ कोटी किमतीचे सोने-चांदीचे दागिने आणि चार गाड्या जप्त केल्या. के.सी. वीरेंद्र हे त्यांच्या सहकाऱ्यांसह, गंगटोकला गेले होते. त्यांनी कसिनोसाठी जमीन भाड्याने घेतल्याचा आरोप आहे. काल त्यांना गंगटोकमधील मॅजिस्ट्रेटसमोर हजर करत बंगळूरूच्या न्यायालयात हजर करण्याची परवानगी मिळवली.





